# डॉ. नितीन मोरे



# शिभ्रष्टाचार!

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

~~शि~~भ्रष्टाचार!

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

शिभ्रष्टाचार!

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : दिवाळी २०१८ (८ नोव्हेंबर२०१८)

©esahity Pratishthan®2018

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.


शिभ्रष्टाचार! - या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.


लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo. com


डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि


डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार


डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच




## डॉ. नितीन मोरे यांची साहित्यसंपदा:

1. चक्रमादित्याचा दरबार १(नाटक)
2. चक्रमादित्याचा दरबार २(नाटक)
3. केल्याने शीर्षासन,
4. नाच जमूरे नाच,
5. अहम ब्रह्मास्मि,
6. मच्छर टाईम्स,
7. संवादोनी प्रकटावे
8. या कोल्हटकरांच्या घरात (नाटक )
9. प्रेमातुराणां (नाटक)
10. सांगतो ऐका (एकपात्री)
11. प्रिय पत्रास



ही सर्व पुस्तके ई साहित्यच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.


www.esahity.com







www.esahity.com



## डॉ. नितीन मोरे यांच्या बाराव्या पुस्तकाच्या निमित्ताने

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची बारा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची

भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत
अध्यक्ष
ई साहित्य प्रतिष्ठान

# गोष्टीरूप भ्रष्टाचार!

चार शब्द..

इंग्लिशमध्ये एक वचन आहे,

what can not be cured should be endured.

भ्रष्टाचाराचे तसेच आहे.
खरे तर त्यापुढे जाऊन नुसतेच सहन न करता त्यातून काही बोध घेता आला तर उत्तम.
म्हणजे

what can not be cured should be endured and enjoyed म्हणा!

भ्रष्टाचाराचा अक्राळविक्राळ राक्षस आपल्या कराल दाढांनी समाजपुरूषास कुरतडतो आणि बोचकारतो आहे.. आपल्या अजस्त्र बाहुंच्या विळख्याने जखडून टाकतो आहे.. त्याच्या करकचून आवळलेल्या बाहुपाशांत समस्त समाजास मूर्च्छित पाडण्याची ताकद आहे.. वगैरे वगैरे वास्तववादी लिहिण्यापेक्षा हा भ्रष्टाचारासुर कसा विदूषकासारखा गुदगुल्या करून मारतोय हे सांगणे जास्त मनोरंजक व्हावे की नाही?

मागे गोष्टीरूप गांधीजी की गोष्टीरूप विनोबा अशी पुस्तके असत. तसेच हे गोष्टीरूप भ्रष्टाचार!

एकूणच विषय आणि आशय पाहता हे पुस्तक हाती देताना आनंद होत आहे हे तरी कसे म्हणावे?
असो!

डॉ. नितीन मोरे

## अर्पणपत्रिका

पुस्तकास विषय पुरवणाऱ्या अगणित ज्ञात अज्ञात 'वीरां'स !

# भ्रष्टाचार!

## अनुक्रमणिका

१ भ भ्रष्टाचाराचा: एक छोटेसे चिंतन!
२ वोट फॉर भ्रष्टाचार!
३ नामदेवरावांची छोटीशी बोधकथा!
४ सुखपुरची नवी गोष्ट!
५ सापळा!
६ मोरेश्वर पंडितांचे प्रमोशन आणि शंकर भगवान
७ 'मी', 'तो' आणि चोरी!
८ दुराचाराच्या ताईताची गोष्ट
९ तीन मडकी
१० खड्डेपुराण
११ तळे राखी तो पाणी (फक्त) चाखी?

## *१ भ भ्रष्टाचाराचा : एक छोटेसे चिंतन !*

भारतासारख्या खंडप्राय देशाची अर्थव्यवस्था काही लाखो हजारो कोटींची. त्यात काही कॉटींची अफरातफर म्हणजे दर्या में खसखस. आपल्याकडे गेल्या कित्येक वर्षांत बोफोर्स, चारा, लॉटरी, भूखंड, 2G, common wealth, आदर्श, व्यापम अशा कित्येक खऱ्या खोट्या घोटाळयांनी इतिहास घडवला आहे ! पुढे काही वर्षांनी इतिहासाच्या पेपरात घोटाळा आणि त्यात गोवलेले नाव अशा जोड्या जुळवण्याचा ५ मार्कांचा एखादा प्रश्न विचारता येईल. आदर्श घोटाळयाने तर त्याच्या संबंधित फायली हरवून घोटाळयांचा आदर्श घालून दिला आहे. आता coommon wealth gamesचे उदाहरण घेऊ. Common wealth चा शब्दशः अर्थ कुणी सामायिक संपत्ती असा घेऊन संबंधितांनी आपापला त्या संपत्तीतला हिस्सा घेतला तर त्यांना बोल का लावला जावा. आपल्याकडे रेल्वेत घोषणा होते की, रेल्वे आपकी संपत्ती है. उद्या कुणी रेल्वेचा एखादा डबा स्वतःचा हिस्सा म्हणून घरी घेऊन जायला निघाला तर आपल्याला त्याला कायदेशीर उत्तर देता येणार नाही तसेच हे commonwealth चे प्रकरण. त्यात एवढा गहजब का व्हावा तेच कळत नाही. व्यापम नावाच्या घोटाळयाने तर व्यापक स्वरूप धारण केले आहे. या खेरीज सत्ताधाऱ्यांच्या लाडक्या उद्योगांचे उद्योग आहेत. न उघडकीस आलेले किंवा पूर्ण पचनी पडलेले घोटाळे असतील. नाही चिरा नाही पणती अशी त्यांची कोठे नोंद ही नसेल. असो. थोडक्यात काय विश्वरूप दर्शना सारखे हे घोटाळे दर्शन !

पण असे असले तरी एकूणच आपल्याकडे नियोजनाचा अभाव आहे. त्याला हे घोटाळे तरी कसे अपवाद ठरतील? नुसते घोटाळे घोटाळे करत बसण्यापेक्षा त्यावर उपाय शोधणे गरजेचे आहे.

सर्व प्रथम चायपानी, अफरातफर, लाच, घॊटाळा अशी त्यातील गुंतलेल्या रकमेवर अवलंबून वर्गवारी व्हायला हवी. उगाच लाखांच्या किंवा काही कोटींच्या गडबडीला घोटाळयाची प्रतिष्ठा देणे योग्य नाही. राज्यात आणि केन्द्रात घोटाळे खाते व घोटाळे मंत्री यायला हवेत. नगरसेवक, आमदार, राज्यातील मंत्री, खासदार, केंद्रातील

राज्यमंत्री आणि कॅबिनेट मंत्री अशा hierarchy नुसार एका विशिष्ट मर्यादेपर्यंत अफरातफरीस घोटाळे खात्यातून sanction मिळवले की ५ वर्षांसाठी तो त्यांचा विशेषाधिकार समजला गेला पाहिजे. आणि त्यावर कोणी टीका केली तर तो विशेषाधिकार भंग समजला जाऊन त्यावर कारवाई केली गेली पाहिजे. घोटाळ्याची मर्यादा १०० कोटीवर नेऊन ठेवता येईल. त्यासाठी दारिद्र्य रेखेच्या धर्तीवर scam line म्हणजे घोटाळे रेषा बनवता येईल.  गरिबी निर्मूलनासाठी दारिद्र्य रेषा खाली खाली आणायचा मार्ग सर्वात सोपा तसा घॊटाळे निर्मूलना साठी ही घोटाळे रेषा वर वर नेता येईल. १०० कोटींवरच्याच कुठल्याही घॊटाळयाची चौकशी करायचे ठरले तर बाकी परचुरण अफरातफरींच्या चौकशी वरचा वेळ आणि पैसा वाचवता येईल. त्याच प्रमाणे प्रत्येक घोटाळ्यावर service tax लावला तर सरकारी महसूलात भरीव वाढ होऊ शकेल. लोकपाल आणि लोकायुक्त हे मुळात खर्चिक इलाज आहेत. त्यापेक्षा घोटाळयांना घोटाळे न म्हणणे हाच भ्रष्टाचार निर्मूलनावर जालीम इलाज आहे.

आणि आता मुळापासूनच उपाय करण्याची गरज आहे.

लहान मुलांना शिकवतानाच 'भ' भटजीचा शिकवण्याऐवजी 'भ' भ्रष्टाचाराचा नि 'घ' घोटाळयाचा असेच शिकवण्याचा गंभीरपणे विचार व्हायला हवा.

म्हणजे भावी पिढ्यांत भ्रष्टाचाराबद्दल काही 'मुल'भूत चिंतन होऊ शकेल !

## २ वोट फॉर भ्रष्टाचार!

आजचा दिवस काही वेगळाच उगवला.
म्हणजे झाले काय की रोज पेपरात कोणा ना कोणाच्या भ्रष्टाचाराच्या बातम्या येतात. घोटाळे नि किटाळे.. त्यावर मग चर्वितचर्वण. दोनचार दिवस रवंथ करणे. मग तो घोटाळा पचला की नवीन दुसरा पुढे येणार. तसे आमचे राजकारणी देखील हुशार नि efficient.. त्यामुळे हे माध्यमांना हे खाद्य नि चारा ते पुरवतात. त्या बिचाऱ्यांना उपाशी मरू न देण्यासाठी कंबर कसून ते आपले कामास जुंपून घेतात. आज कोठे हे घोटाळे नसते तर कितीएकांचा रोजगार बुडला असता. चिंता करतो विश्वाची या न्यायाने हे आमचे समाजधुरीण सर्वांच्या हातांस काम पुरवतात.
या बदल्यात त्या बिचाऱ्यांना काय मिळते? नकारात्मक बातम्या नि चौकश्यांचा ससेमिरा? कितीही झाले तरी हे सारे थोर देशसेवक. काही प्रधान, काही साधे. यांच्या तोंडास जरा काही डाग लागलेले दिसले की साऱ्या सिस्टीमने त्यामागे लागावे? इतका कृतघ्नपणा आपल्यात आला कुठून? तर आज याच्या उलटे झाले!

अखिल भारतीय घोटाळा पार्टी (अभाघोपा) स्थापन झाली आणि खळबळ माजली.
त्याची घोषणाच पहा :
या पार्टीच्या सभासदास किमान एका घोटाळ्यात सहभागी असणे गरजेचे असे त्याची घटनाच सांगते. अत्यंत शुद्ध चारित्र्याच्या लोकांस येथे प्रवेश असेल. म्हणजे सत्य दडपून कोणी खोटे खोटे घोटाळ्यात सहभागी असल्याचे दाखवले तर त्यास दयामाया नाही. आम्ही सगळे सहन करू पण या बाबतीत आमची ध्येयधोरणे सुस्पष्ट आहेत.. किमान एक घोटाळा हवा, त्याबद्दल पेपरात रिपोर्ट हवा. पोलिस ऍक्शनचा काही रेकॉर्ड हवा. तुरूंगवारी असल्यास उत्तमच. म्हणजे किमान पात्रतेच्या व्यक्तीस सभासद होता येईल तर तुरूंगवासाचे कष्ट उपसलेल्यांस सरचिटणीसपद. हा तुरूंगवास मात्र कोणत्या राजकीय कारणानी झालेला नसून कुठल्यातरी गुन्हेगारी - भ्रष्टाचारी कृत्याबद्दल असावा. याखेरीज कोटींचा घोटाळा करणाऱ्यास अधिक पात्र समजले जाईल. प्रामाणिकपणाने आपले घोटाळे करणाऱ्यांची कदर केली जाईल. पक्षाच्या यूथविंग मध्ये नवीन तरूणांस जे चोरीमारी, दरोड्यात आपले करियर बनवू

इच्छितात, त्यांना राजकीय प्रशिक्षण देऊन मुख्य प्रवाहात भावी नेतृत्वास मुख्य प्रवाहात आणले जाईल.
अशा या प्रकारची घोषणा झाल्यावर गहजब न होता तरच नवल! पण सत्यमेव जयते ब्रीद असलेल्या या देशात हे सद्यस्थितीतले किमान सत्य आहे आणि हे मान्य होत आहे ही मोठी घटना आहे असे मत थोर तत्वचिंतक आचार्य घ. न. कर्वे यांनी व्यक्त केले. राजकारणातील पारदर्शकता ती हीच.. उज्ज्वल उद्यासाठी अशा प्रामाणिक पक्षाची गरज आहे असेही ते म्हणाले.

आम्ही मग स्वस्थ बसलो नाही. आचार्य म्हणतात म्हणजे भविष्य उज्ज्वल असणारच. तेव्हा आम्ही ज्योतिर्विशारद श्री. विनय उदय आचार्य यांना भेटून पुढील स्थितीचा आढावा घेतला. हे आचार्य नुसते नावाचेच आचार्य नाहीत. त्यांचा अभ्यास गाढा. तारीख वेळेनुसार भविष्य सांगण्यात  हातखंडा असणाऱ्या आचार्यांनी या आधी म्हणजे २२ जुलै २०१२ रोजी दुपारी २. २२ ला जगबुडीचे अचूक भविष्य वर्तवले होते. यानंतर दुसरी जगबुडी एका तपाने हे ही त्यांचेच भाकित. मागे त्यांनी योजलेल्या काही ज्योतिषी उपायांमुळे पहिली जगबुडी टळली होती. अशा या विशारदाचे भाकित हे बातमीसारखेच छापावयास हवे.. तसेच आम्ही छापत आहोत! त्यांनी भाकित केलेले पुढील काळात निघणारे काही पक्ष असे :

अखिल भारतीय भ्रष्टाचार पक्ष (अभाभप)
अखिल भारतीय घोटाळा पक्षातून ध्येयधोरणांबद्दल मतभेद झाल्याने फुटून निघालेला पक्ष. याची घटना बरीचशी मूळ पक्षासारखी असली तरी ती तसे नसल्याचे संस्थापकांचे म्हणणे आहे. ‘घोटाळा हा भ्रष्टाचाराहून मोठा म्हणून आम्हीच मोठे’ असे ‘पितृ-पक्ष’ म्हणतो तर ‘भ्रष्टाचार हा घोटाळयाचा जनक.. म्हणून आम्हीच मोठे’ असा या नवीन बालकाचा दावा! असो. यानिमित्ताने जनतेस नवा ऑप्शन मिळाला हे महत्वाचे!

खूंखार पार्टी (खूंपा)
ही लढाऊ लोकांनी स्थापिलेली एक संघटना. त्यांनी पुढे राजकारणात प्रवेश केला. त्यांच्या पक्षात चोर, डाकू आणि लुटारूंना सामवले असून खुनासारख्या

आरोपाखालील व्यक्तीस खास दर्जा दिला जातो. चाकू, बंदुकानी बनवलेली त्यांची निशाणी खूप काही सांगून जाते. खूंखार हे नाव ही पक्षाच्या ध्येयधोरणांस साजेसे आहे.

खंडणीखोर्स ऑफ इंडिया ( केकेआय )

खंडणीखोर आणि ब्लॅकमेलर्स यांची एक्स्लूजिव्ह पार्टी. 'काळे धन ब्लॅकमेलिंगतून' हे यांचे ब्रीद वाक्य, म्हणून पांढऱ्यापैशास हात देखील न लावण्याचा यांचा बाणा आहे. विविध मार्गांनी विविध प्रकारे गोळा केलेली खंडणी हे स्वरूप राजकीय वाटत नसेलही पण त्यांनी याचे एक राजकीय तत्वज्ञान बनवले असून त्यातून निवडणुका लढवणे हे यांचे मुख्य उद्दिष्ट आहे.

गरीब पक्ष ( गप )

गरीबी हा मोठाच सद्‌गुण आहे. म्हणजे ती असली की हटवण्याची घोषणा करता येते. हा पक्ष रॉबिनहूडच्या टाईपचे काम करतो. खाऊ नि मिळून वाटून घेऊ हे यांचे तत्वज्ञान. त्यातील ठराविक हिस्सा गरीबांस हे वाटून देतात. अर्थात गरीब कोण हे ठरवायचे हक्क ही यांच्याकडेच. मदतीची आस यांना एवढी असते की कोणी गरीब दिसला नाही तर काहींना लुटून हे गरीब बनवतात नि मग मदत करतात.

तूप ओढा पार्टी ( तूओपा )

आपल्या पोळीवर तूप ओढणे हे आज राजकीय़ तत्वज्ञान म्हणून मान्यता पावलेले आहे. तेव्हा या पक्षाचे भविष्य उज्ज्वलच असेल हे सांगायला ज्योतिषी नको!

अखिल भारतीय स्वच्छ पक्ष ( अभास्वप )

रोज चमचमीत तिखट-जाळ खाणाऱ्यास गोडाचे कौतुक. तशी भ्रष्टाचाराने बरबटलेल्यात ही अभास्वप आपले 'आरक्षण' बनवून आहे. कोणत्याही पक्षातले करून करून भागले नि देवपूजेस लागले या टाईपच्या लोकांचे आश्रयस्थान. गंगेत डुबकी मारून पापे धुतली जातात तशी या पक्षात नुसते सामील होऊन शुद्धीकरण करून घेता येते. अर्थात नावात स्वच्छता असली तरी आतून मात्र आपल्या स्वत:च्या भ्रष्टाचाराबद्दल फारसा तिटकारा नसलेला हा पक्ष इतरांच्या तशा वर्तणुकीवर लक्ष

ठेवून असतो. आपल्या उलाढालींवर कोणाचे लक्ष न जाऊ देण्यात तरबेज असा हा पक्ष इतरांना मात्र तत्वज्ञानाचे डोस पाजत असतो. यातून स्वच्छ भारत होण्याची स्वप्नेही दाखवतो.

थोडक्यात काय भ्रष्टाचाराचे भविष्य उज्ज्वल आहे. भ्रष्टाचार करा नि सुखात जगा.. उगाच त्याबद्दल वाईटसाईट बोलून वातावरण कलुषित करणाऱ्यांपासून सावध रहा. लाचलुचपत, चोऱ्यामाऱ्या, दरोडे, फसवणूक हा या युगाचा शिरस्ता आहे. सत्याकडे शहामृगासारखे डोके खुपसून वा डोळे मिटून पाहिल्याने सत्य बदलत नाही.. उगाच आत्मवंचना नको.. खऱ्याखुऱ्या सत्यास सामोरे जा.. उचला ते तुमचे बोट नि दाबा ते व्होटिंग मशीनचे बटण.. भ्रष्टाचारास आपले किंमती मत द्या.. तसाही तो विजयी होईलच.. पण आपल्या पाठिंब्याने भरघोस मतांनी विजयी करा.. व्होट फॉर.. भ्रष्टाचार.. !

## ३ नामदेवरावांची छोटीशी बोधकथा!

मध्यंतरी कासारगावात मोठीच धामधूम होती.

कासारगावचे आमदार, राज्यातील आजवरचे सर्वात तरूण मंत्री राज्याचे शिक्षण मंत्री नामदेवराव मोहिते जेल मधून बेल वर सुटून आले तेव्हा त्यांचे धूमधडाक्यात स्वागत झाले.

नामदेवराव राज्यातले सर्वात तरूण मंत्री.

तीन वर्षांपूर्वी डायरेक्ट विधानसभेवर आमदार म्हणून ते निवडून आले नि लगेच मंत्री पण झाले.

मंत्री होताच त्यांनी कामाचा धडाका लावला. नवी पाटी पेन्सिल योजना आखली आणि राबवली देखील.

त्यात शिक्षणखात्या सारख्या अनुत्पादक खात्यातून कोट्यावधींचे उत्पादन पण करून दाखवले.

मग त्या घोटाळ्याची चौकशी होऊन तीन महिने तुरुंगवास. नंतर रीतसर बेलवर सुटका.

तीन वर्षांतला त्यांच्या प्रगतीचा आलेख थक्क करणारा होता.

शिक्षण खात्यात एवढी धडाडी तर महसूल-बिहसूलात काय करतील हे.

अगदी अचंब्याने त्यांचे पाठीराखे आणि विरोधक त्यांच्याकडे पाहू लागले.

नेतृत्व नेतृत्व म्हणतात ते हेच अशी त्यांच्या मतदार संघात सर्वांची खात्री पटली.

आणि बेल मिळून आल्यावर त्यांचे विजयी वीरासारखे जंगी स्वागत झाले.

जेल मधून आल्यावर त्यांनी राहिलेली कामे धडाक्याने हाती घेतली.

त्यात सर्व प्रथम त्यांचे तुरूंगवासाने पुढे ढकललेले लग्न उरकून घेतले.

त्यांच्या पाटी पेन्सिल घोटाळयाचे एव्हढे नाव झाले की त्यांच्या लग्नात त्यांच्या बायकोने नाव घेतले ते ही असे, ‘घोटाळयात घोटाळा पाटी पेन्सिल घोटाळा आणि लाजत लाजत नाव घेते नामदेव रावांची मंजुळा. ’

या उलट काही वर्षांपूर्वीची कासारगावच्या शेजारील ओसाडगावची कहाणी.

नरसिंग राव पाटील हे तिथले एक बडे प्रस्थ. त्यांनी कोटी कोटीनी माया गोळा केली होती.

त्यांचा नातू कुठल्यातरी प्रकरणात १०००० रुपयांची लाच घेताना पकडला गेला आणि नरसिंग रावांनी अंथरूणच धरले.
जिथे लाख आणि कोटी खाली बात होत नाही तिथे हजारांची लाच मागून घराण्याच्या नावाला कलंक लावायची अवदसा आपल्या नातवाला आठवावी याचा त्यांना जबर धक्का बसला.
जिथे लाखांची फुले वेचली तिथे या हजारांच्या गोवऱ्या वेचाव्या लागाव्यात यामुळे हाय खाऊन त्यांचा त्यातच अंत झाला.
पुढे त्यांच्या नातवाला १ वर्षाची शिक्षा झाली.
१०००० रूपयांच्या लाचखोरीत पकडले गेल्याने सारे पाटील खानदान देशोधडीला लागले.

या उदाहरणातून लहानग्या नामदेवाने बोध घ्यायचा तो घेतला, तो म्हणजे घोटाळा करा पण काही respectable रकमेचा करा.
आणि तरूण पणी तो अमंलात पण आणला.
शेवटी पुढच्यास ठेच मागचा शहाणा म्हणतात ते उगीच नाही !

## ४ सुखपूरची नवी गोष्ट!

सुखपूर नावाचे राज्य नावाप्रमाणेच सुखी..
सुख पुरेपूर भरून वाहणारे.. म्हणजे ओसंडणारे म्हणून त्याचे नाव सुखपूर पडले असावे का? गोष्ट तशी जुनी म्हणजे प्राचीन म्हणावी. विक्रम-वेताळातल्या गोष्टीत एक सतयुग नि कलियुग यांच्या संधिकालात घडणारी गोष्ट आहे तशी म्हणावी अशी! थोडक्यात सुखपूर तेव्हा सुखाने ओसंडत होते.
राज्यात सगळे काही होते, पैसा अडका, सोने नाणे.. लोक उद्यमी.. शेतकरी प्रगत नि सधन. अशा स्थितीत काय नव्हते तिथे? तर ना चोरी ना लबाडी.. ना दरोडेखोरी.. ना मारामाऱ्या न लाचलुचपत. लोक एकमेकांना सांभाळून रहायचे. राग आला तर ते एक ते दहा आकडे मोजून तो जिरवायचे. त्यात राग शांत झाला की हात मिळवणी.. दिलजमाई वगैरे. लोकांना ना हाव ना पैशांची लालसा. मग एकूण ते गाव संपन्नतेकडे वाटचाल करत होते. सुखपूरचा भ्रमसिंगराजा आजच्या काळात असता तर त्याने आपल्या छबीतल्या जाहिराती पानोपानी छापल्या असत्या.. आणि त्यात सत्य सोडून दुसरे काही कोणास शोधूनही आढळले नसते.

चंद्रावरही डाग हा सृष्टीचा नियम आहे. येथे तोच नियम लागू न पडता तर नवल! सगळे असले तरी राज्यात काही एक अस्वस्थता होती. याला कारण बेरोजगारी. घरातल्या एकाने कमावले तरी ते पुरेसे पडते तर बाकीच्यांनी काय काम करावे? काही तसे करत त्यांना अतिरिक्त संपत्तीचे काय करावे कळत नसे, अशात रिकामे हात नि डोकी चक्रावून न गेली तर नवल.

अशाच काही रिकाम्या डोक्यांनी आपल्या भ्रमसिंगराजाकडे एक शिष्टमंडळ नेण्याचा विचार पक्का केला. सुखपूरचा राजा तो! संवेदनशील असणारच. सहानुभूतीने त्याने सगळे ऐकले नि नावाला जागून राजा भ्रमात पडला. लवकरच तोडगा निघेल म्हणून त्याने आश्वासन दिले. आणि आता काय करावे म्हणून प्रधानजींस सांगावा धाडला! राज्य चालवणे कठीण असेल पण सुखपूरात ते अजूनपर्यंत सोपेच होते. त्यामुळे अशी काही समस्या हाताळण्याचा राजाला अनुभव नव्हता.

प्रधानजी आले ते आपली झोप मोडून. सुरळीत चालणाऱ्या त्या राज्यात जास्त काही काम नव्हते.. अर्थात पगार चालू असल्याने त्यांचीही काही तक्रार होती असे नव्हे. भ्रमसिंगराजांच्या निरोपानंतर त्यांनी तडक राजमहाल गाठला..

“महाराज, काय हुकूम?”

“प्रधानजी, आपल्या राज्यातील रिकामटेकडे असोसिएशन ऑफ सुखपूरचे तरूण येऊन भेटले आम्हास. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या हातांना काम नाही. ”

“तसे ते आम्हास ही नाही. ” म्हणता म्हणता प्रधानजींनी जीभ चावली, महाराजांनी पगार कमी केला तर? “खरेय महाराज.. ”

“मग यावर उपाय काय?”

“समिती.. महाराज”

“समिती? पण एका समितीत इतके सगळे? सगळयांना सामावून घेईल अशी समिती कशी बनेल प्रधानजी?”

“क्षमा असावी महाराज.. समिती आपण नेमू.. समस्येचा अभ्यास करण्यासाठी.. मग दुसरी त्यावर उपाय शोधायला.. ”

“मग तिसरी.. ते उपाय.. योजना करायला.. वा.. ! एक समिती.. पंधरा माणसे.. या हिशेबाने पंचेचाळीसांची सोय होईल.. नेमून टाका समिती.. आला अहवाल की सांगा..”

“होय महाराज. ”

रीतसर समिती बसते.. रीतसर अहवाल येतो. रीतसर महाराजांसमोर मांडला जातो.. रीतसर खलबतं होतात..

काय असते अहवालात?

समिती आजूबाजूच्या देशांच्या स्थितीचा धांडोळा घेते. त्यात असे आढळते की सुखपूर सुखी असेल ही पण मागास आहे. येथे ना चोर आहेत. नि त्यामागोमाग येणारे पोलिस. तुरूंग नाहीत नि न्यायालयेही. त्यात तुरूंगातले किंवा पोलिसस्टेशनातले कर्मचारी नाहीत. शेजारील राजाच्या दरबाराबाहेर पहारेकरी असतात, तेही नाहीत. सगळेच सुरक्षित असेल तर कोण कोणाची रक्षा करणार? थोडक्यात या क्षेत्रात मोठीच पोकळी

आहे. हे क्षेत्र उघडल्यास त्यात अनेक नोकऱ्यांच्या संधी आहेत. चोरी, लबाडी, दरोडे, भांडणे, मारामाऱ्या, लाचखोरी इ. मुळे राज्यास एक प्रकारे चैतन्य येते. त्यामुळे या क्षेत्रातला शंभर टक्के अनुशेष भरल्यावाचून राज्याची भरभराट होणार नाही.

अहवाल सादर झाला तसा भ्रमसिंगांचा भ्रम दूर झाला. त्यांचे डोळे खाडकन उघडले. आजवर सुखपुरास ते सुखी समजून चालले होते. राजे अंतर्मुख झाले. त्यांना कोणीतरी गदागदा हलवल्यासारखे झाले. त्यांनी ठरवले, बाकी सरकारी अहवालांची गत कशीही होवो.. हा अहवाल गांभीर्याने घ्यायचाच. देशातील स्थिती बदलायचीच.. मग त्यासाठी कितीही प्रयत्न लागोत.. आपल्या नागरिकांना हा नवीन रस्ता दाखवायलाच हवा! दरबार बरखास्त झाला. प्रधानजी नि बाकी दरबाऱ्यांना त्यांनी परत पाठवून दिले. आपल्या महालात ते विचारात गढून गेले. त्यांच्या राज्यात एवढे विचारात पडावेसे अजूनपर्यंत काहीच घडले नव्हते! रात्री त्यांच्या तेथेच डोळा लागला. त्यात स्वप्नही त्यांनी पाहिले.. सारे काही अशांत.. लोक धावताहेत.. पोलिस.. तुरूंग.. स्वत: महाराज न्यायनिवाडा करताहेत.. कोणी हळूच लाच खातोय.. मग पकडला जातोय.. त्याला वाचवणारे वकील.. पकडणारे पोलिस.. नि त्यामागून येणाऱ्या यंत्रणा.. सर्वांना कामच काम.. बेरोजगारीला विराम.. सगळीकडे दाम करी काम.. कलियुगातला कली शिरलाय.. महाराज जागे झाले ते असे स्वप्न पाहूनच!

दुसऱ्या दिवशी महाराजांनी जनसभा बोलावली. सुखपुरातील सगळे रस्ते माणसांनी फुलून उठले. महाराज काय बोलणार यासाठी आतुर गर्दी जमली. भ्रमसिंग काय बोलणार याचा अंदाज ना प्रधानांना ना कोणा मंत्र्यांना.. ते ही उत्सुक.. काय बोलणार महाराज?

मोठी सभा झाली. महाराजांनी प्रजाजनांना उद्देशून भाषण केले:

“माझ्या सुखपूरवासी बंधुभगिनींनो,

आजवर मी म्हणत आलोय की हे सुखपूर हे संपूर्ण.. परिपूर्ण राज्य आहे.. येथे काय नाही? सुखसमृद्धी आहे.. सारे प्रजाजन नेक आहेत. येथे लांड्यालबाड्या नाहीत, चोऱ्यामाऱ्या नि डाके नाहीत.. त्यामुळे त्यातून येणारे संघर्ष नाहीत. आम्हास वाटले एक राजास काय हवे अजून? पण आमच्याच प्रजेने आमचे डोळे उघडले.. जग कुठे

चालले नि आम्ही कोठे आहोत? येथे सतयुग कवटाळतो आहोत आपण.. कलियुगाचा फेरा आला तरी.. संपत्ती हा या युगाचा पाया आहे. तो मजबूत हवा. तो तसा व्हावयास हवा असेल तर तितकी संपत्ती जवळ हवी.. मग ती कोठूनही येवो.. कशीही येवो.. सरळमार्गे आजवर जगत आलात तुम्ही.. भरपूर आनंद लुटला.. आता बदल्यात कलीचा संदेश ऐका.. लुटा.. पण आनंद नाही.. संपत्ती लुटा.. जिथे मिळेल तेथून.. ओरबाडा.. लुटा.. पळवून न्या.. किंवा फसवून न्या.. पाया मजबूत करा.. हे सर्व कशासाठी? आजच्या नाही.. उद्याच्या आनंदासाठी.. आनंदाची व्याख्या नीट बनवा.. जुनी व्याख्या बदला.. जो धनातून येतो तोच आनंद.. आजपासून आम्ही नवीन नियुक्त्या करत आहोत.. पोलिस.. शिपाई.. पहारेकरी.. न्यायालये.. त्यातील कर्मचारी.. या सर्वांस काम मिळवून देण्याचे काम तुमचे.. ती तुमची जबाबदारी समजा.. बदलत्या मनूचा हा संदेश.. सत्ययुगातून कलियुगाकडे.. तेव्हा जुन्या सवयी विसरा.. उपटा झिंज्या एकमेकांच्या.. होऊद्यात भांडणे भावाभावात.. संपत्तीसाठी बसा एकमेकांच्या उरावर.. पडूद्यात चार गुद्दे.. काही मुडदे.. लक्षात ठेवा.. धन हाच ईश्वर.. ”

महाराजांच्या या वाणीचा प्रभाव सर्व जनतेवर न पडला तरच नवल. महाराजांच्या त्या एका भाषणात सारी जनता बदलण्याचे सामर्थ्य होते.
लोक बदलले..
जवळजवळ नव्वदटक्के राजभक्त बनले.. महाराजांनी दाखवलेल्या वाटेवर भक्तिभावाने चालू लागले.
आणि उरलेले दहा टक्के.. अल्पसंख्य राजद्रोही.. आपल्या जुन्या मूल्यांना.. जुन्या सुखपुराला कवटाळून बसले! आपल्या छोट्या झोपडीवजा घरात..
नि बाकी नव्वद टक्के..
आपापल्या महालात इतरांना ठकवण्याचे.. अजून मालामाल होण्याचे मनसुबे बनवण्यात मग्न झाले... उद्याच्या आनंदासाठी!

## ५ सापळा!

स्थळ: एक सरकारी ऑफिस.
सरकारी कचेरी जशी दिसावी तसे. मागे गांधीजींचा फोटो. बाजूला चालू सरकारच्या पंतप्रधानांची छबी असलेले कॅलेंडर. आतमध्ये केबिन असावी असा एक दरवाजा.
एक उच्चमध्यमवर्गीय आणि मध्यमवयीन माणूस आत शिरतो. नाव महत्वाचे नाही. सोयीसाठी जाधव म्हणूया. जाधव येतात. हातात चांगल्यापैकी बॅग. सोनेरी काड्यांचा चष्मा.
समोर टेबलांखुर्च्यांवर कर्मचारी बसले आहेत. त्यांच्या पुढे नावाच्या पाट्या. एस. आर. कांबळे, बाजूला रा. तु. परब, सुहासिनी जोशी, ज. जी. आचार्य. आजूबाजूला काही रिकामी टेबले आहेत. एका वर कु. चं. कुळे अशी  पाटी. ते टेबल ही रिकामे आहे. कांबळे वर्णाने काळे आणि चेहऱ्यावर छद्मी हास्य असलेले. परब पन्नाशीतील गृहस्थ, सुखवस्तुपणा दाखवणारा तुकतुकीत चेहरा. जोशीबाई तिशीतल्या. हातात विणकामाच्या सुया, बाजूला मोबाईल घेऊन बसलेल्या. तर आचार्य एखाद्या वारकऱ्यासारखे दिसणारे. एक पात्र अजून आहे. तो म्हणजे भगवंत, म्हणजे ऑफिसातला शिपाई. चाळीशीत असावा. कपाळावर गंध, गळ्यात तुळशी माळ.

जाधव: कुळे साहेब इथेच बसतात ना?
कांबळे: हुं..
जाधव: मला भेटायचे होते
कांबळे: मग भेटा. अगदी साग्रसंगीत रामभरत भेट होऊ देत.. काय परब?
परब: हो ना!
जाधव: पण कुळेसाहेब कुठेत?
परब: आम्हाला माहिती असते तर सांगितले असते की नाही? काय जोशीबाई?
जोशी: हो ना! आज एवढा विणून झाला की छान..
जाधव: कोण छान? कुळे?
जोशी: हॅं हॅं हॅं हॅं.. भारीच विनोदी बाई तुम्ही..

परब: कुळेंना विणून झाले?

कांबळे: कॅय तरी.. कॅय काम आहे?

जाधव: कुळेंनी एक महिन्यापूर्वी बोलावले होते..

जोशी: मग आज कशाला आलात?

कांबळे: महिन्यापूर्वी यायचेत हो की नाही परब?

परब: हो ना!

जाधव: तसे नाही.. महिन्यानंतर बोलावले होते..

कांबळे: मग आज कशाला? या महिन्यानंतर

जाधव: नाही.. तसे नाही.. महिन्यापूर्वी मी आलो होतो. तेव्हा त्यांनी आज यायला सांगितले होते..

आचार्य: महिना! ही सृष्टी नश्वर आहे.. आज आहे तर उद्या नाही.. उद्या आहे.. तर परवा नाही..

परब: आणि परवा आहे तर तेरवा नाही..

जोशी: ऐकले का? काल दाखवले टीव्हीवर.. परवा जगबुडी येणार..

कांबळे: च्यायला! उगाच आलो आज.. मस्त ताणून दिली असती

परब: काहीतरीच.. परवा जग बुडले की काय ताणूनच ताणून द्यायचीय

जाधव: कुलभूषण कुळेसाहेब कुठेत?

जोशी: अय्या.. कु कु कु.. कुलभूषण कुळे कुठेत..

कांबळे: कोंबडा आरवल्यासारखा वाटतो.. कुकूच कू.. हो की नाही?

परब: हो ना

जाधव: अहो काम महत्वाचेय..

आचार्य: अहो काम म्हटले की महत्वाचेच असायचे.. स्वामी म्हणतात.. डावे उजवे नको कामात.. हे जग सोडून जाताना जगन्नियंता विचारेल तेव्हा तयार ठेवा हिशेबाच्या चोपड्या

जोशी: अय्या.. माझे ते अकाऊंट टॅली करायचे बाकी आहेत..

आचार्य: ते होईल हो जोशीबाई.. पण ते नव्हेत.. कुठे त्या नश्वर जगाच्या नश्वर क्षूद्र चोपड्या आणि कुठे त्या चित्रगुप्ताच्या दरबारात पाप पुण्याचा हिशेब लिहिलेल्या वह्या..

परब: आचार्य.. एक विचारू.. म्हणजे तुम्हाला माहिती असेल म्हणून.. काये अभ्यास दांडगट तुमचा..

जोशी: अय्या! दांडगट नै कै.. दांडगा!

परब : तेच ते.. तर त्या तिथे चित्रगुप्ताच्या ऑफिसात कॉम्प्युटर असतो काय?

कांबळे: एक करूया.. परबांना पाठवून देऊ.. बघून या प्रत्यक्ष डोळ्यांनी

आचार्य: मस्ती नको परब.. कांबळे..

जोशी: हो ना! देवादिकांची कसली करताय थट्टा?

जाधव: अहो.. कुळे कुठे भेटतील?

कांबळे: हुं.. अस्से विचारा.. की तसे.. या इथल्या कोणासही याचे उत्तर ठाऊक नाही!

जाधव: अहो पण..

आचार्य: अहो नाही नि जाहो नाही. कुळे कुळे कितीही आक्रोशला बळेबळे तरी न कळे.. समस्त जगताच्या स्वामीस ठावे..

जोशी: (एकाएकी वर बघत) अय्या.. कुळेसाहेब हवेत तुम्हाला? मग तसे विचारायचे नाहीत?

जाधव: तेच विचारतोय..

जोशी: तेच काय तेच? कुळेंची बदली झाली!

कांबळे: हेड्डॉफिसला..

जाधव: कुठे?

जोशी: कुठे हवेत की कुळे?

जाधव: (हट्ट केल्यासारखे) नाही हो फक्त कुळे हवेत

जोशी: अय्या.. असे बोलता ना तुम्ही.. आज किनई आमच्या राज नी असाच हट्ट केलेला.. फक्त एक्लेयर्स हवे म्हणून.. फार चंट झालाय लब्बाड..

जाधव: मी नाही हो लबाड.. ते कुळे?

कांबळे: हेडॉफिस..

जाधव: म्हणजे?

परब: हे.. डॉ.. फि.. स..

जाधव: हां.. म्हणजे हेड ऑफिस.

परब: तेच तर म्हणाले कांबळे.. कुळे हवेत तर गाठा हेडॉ.. नाही तुम्हाला ते नाही कळत.. गाठा हे.. ड.. ऑ.. फि.. स..

जाधव: अहो पण माझे पेपर इकडे या ऑफिसात आहेत ना!

जोशी: असतीलही!

जाधव: असतील.. नाही आहेतच!

जोशी: जशी मर्जी तुमची..
जाधव: माझी कसली हो मर्जी त्यात. ते पेपर्स.. कुळे..
परब: काय हो.. आचार्य.. या कुळ्यांचे नाव एखाद्या देवाचे असते तर आज या काकांना किती पुण्य प्राप्ती झाली असती नाही.. नुसत्या नामस्मरणाचा महिमा..
आचार्य: पहिल्यांदा योग्य बोललात परब.. नामस्मरणाचा अगाध आहे महिमा.. स्वामी म्हणतात.. जपना नाम जय श्रीराम.. स्वामी म्हणतात..
जाधव: पेपर माझे..
आचार्य: नाही.. स्वामी पेपर बद्दल काही नाही बोलत.. स्वामी म्हणतात.. जळी स्थळी काष्ठी पाषाणी.. चराचरात व्यापून उरलेल्या त्या भगवंताचे नामस्मरण करा..

परब: आणि भवसागरातून तरूण जा

आचार्य: तरून.. जा.. तरूण नाही!

जाधव: अहो.. माझ्या पेपरांबद्दल कुणी माहिती देईल का?

परब: पेपर! तुम्हाला पेपर हवेत?

जाधव:हो..
परब: ते कुळे साह्यबांकडचे..

कांबळे: मागच्या महिन्यात दिलेले?

जाधव: हो.. ते हिरव्या फायलीत होते..

कांबळे: ते हिरव्या फायलीतले.. जोशीबाई तुम्हाला ठाऊक आहेत?

जोशी: (दचकते) अय्या! ही हिरवी साडी ना? नवीन नाहीये.. जुनीच.. काहीतरीच तुमचे

कांबळे: काहीतरीच काय? हिरवी फाईल नि पेपरबद्दल बोलतोय..

जोशी: होक्का? मग तसे विचारायचेत ना? नाही ठाऊक..

जाधव: मी कोणाकडे जावे?

परब: भगवंत..
आचार्य: हे बरे बोललात.. भगवंताहून दुसरा कोण असणार सहारा.. तोच तारितो तोच मारितो..
परब: ते खरेच आचार्य.. पण मी आपल्या भगवंत शिपायाला मारत होतो हाक! भगवंतSS

(भगवंत शिपाई आतून बाहेर येतो)

भगवंत: तुमी बोलावले सायेब? हाक आयकून ते तसेच टाकून आलो.. जगदंब.. हेरंब.. जगदंब..

परब: काय टाकून आलास भगवंता?

भगवंत: हातचे काम सायेब.. बोला काय हुकूम?

कांबळे: इस्पीक!

जोशी: (लाडिकपणे) अय्या.. आमच्या गावाकडे किनई नवऱ्याला हुकूम म्हणतात..

कांबळे: म्हणजे.. इस्पीक?

परब: नवरा आहे तेव्हा.. बदाम म्हणा कांबळे..

जोशी: (लाजत) अय्या! काहीतरीच.. चावटपणा

भगवंत: मला कशाला बोलाविले धाडले?

परब: अरे हां.. हे साह्येब आलेत त्यांचे पेपर कुठेत? कुळेसाहेब कुठे ठेवून गेलेत?

भगवंत: मला कुठे ठावकी सायेब.. पण शोधू शकतो.. जगदंब..

जाधव: अहो मग शोधा ना.. मला आज बोलावलेय ते..

परब: भगवंता.. जा तर बिचारे खोळंबलेत साहेब. त्यांची सेवा कर. मदत कर त्यांना.

भगवंत: हे काय सांगणं साह्येब.. या हितं या.. या सायडीला.. हेरंब.. जगदंब.. जगदंब.. या अशे हिकडे..

(दोघे बाजूला जातात)

जाधव: (कुळेंच्या टेबलाकडे पाहात) तिकडे ठेवलेत पेपर.. मला वाटते इथेच असणार.. कुळयांच्या टेबलात..

भगवंत: जगदंब.. जगदंब.. आता सांगा.. किती म्हत्वाचे हायेत पेपर तुमचे?

जाधव: अहो खूप.. पुढचे सगळे त्यावर अडकलेय..

भगवंत: मग ठरवा तुमीच सायेब..

जाधव: काय?

भगवंत: पेपर कधी मिळनार.. जंटलमन दिसत्यात.. अवो हापिसचा नियम हाये.. तुमाला पेपरची जल्दी किती त्यावर औलंबून हाये.. जगदंब..

जाधव: म्हणजे?

भगवंत: अवो.. म्हंजे म्हंजे काय? हे हापिस किती मोठेय..

जाधव: हां.. तसे मोठेच म्हणायला हवे..

भगवंत: त्यात शोधाशोध करायचे म्हणजे.. टेबल किती.. खुर्ची किती.. दरेक टेबलावर पेपरवर वजन ठेवायला लागते.. वारा लई हिते.. पेपर उडाया काय येळ लागतो का?
जाधव: अहो पण कुळेंना देऊन झालेय सगळे..
भगवंत: काय सायेब.. तसे तुमी हेडॉफसात जाऊन यू शकतात.. ते भेटतील तिथं
जाधव: पण पेपर इथेत ना..
भगवंत: नाय साह्येब.. ते खरं.. पन ते कुळेंना भेटले की बरे वाटल ना.. म्हणून
जाधव: अरे.. पण पेपर इथे आहेत ना..
भगवंत: त्येच तर मी सांगून राह्यलो.. नवा भिडू नवे राज्य.. ल्हान मुलं खेळत्यात तसे..
भगवंत: मग काय.. किती अर्जनट ठरवा.. जाधव: म्हणजे..
भगवंत: काय सायेब.. त्येच त्येच परत सांगाया टायम नाय.. जगदंब.. जगदंब..
(जाधव खिशातून नोटा काढून भगवंतच्या हातावर ठेवतात)
जाधव: एवढे पुरतील?
भगवंत: सायेब.. टेबलं मोजलीत ना? ह्यात काय होतंय.. ?
(अजून थोड्या नोटा देत)
जाधव: मग हे अजून..
भगवंत: (पैसे खिशात ठेवत) चालतील.. एका आठवड्यात या सायेब.. काम झालच समजा.. या भगवंतचे काम चोख.. जगदंब.. जगदंब.. या सायेब.. याच वेळी आलात की पेपर हातात.. देवाची आन..
जाधव: अरे तुम्ही आज देणार होतात..
भगवंत: काय चेष्टा गरीबाची सायेब.. एवढ्यात आज कसे काम होणार? पेपर शोधायची काय सोपी बाब साह्येब? वारं किती डेंजर सुटतंय.. वर अजून कामे खोळंबलीत..
जाधव: अजून हवेत.. सांगा तसे..
भगवंत: नाय सायेब.. (हात पुढे करत) आपण अशे मागत नाय..
(जाधव अजून नोटा काढून हातावर ठेवतात)
भगवंत: आता ठीक.. थांबा सायेब.. आलेत तर पेपर घेऊनच जावा.. उगा परत परत जा ये.. जंटलमन दिसता म्हणून.. जगदंब.. हेरंब.. जगदंब..
जाधव: नक्की मिळतील ना आजच?

भगवंत: नक्की म्हणजे काय? गळयात माळ हाय.. वावगं नाय बोलत.. हिकडं या सायेब.. माज्या मागून.. आन एक ध्यानात ठेवा.. त्या जोशीबाईंकडे हायेत पेपर.. जास्त बोलू नगा.. घ्या आन सुटा..

जाधव: म्हणजे पेपर तयार आहेत?

भगवंत: साह्येब.. हवेत ना पेपर? म्हनलं ना जास्त बोलू नगा.. गुमान पेपर घ्या न सुटा.. या भगवंतचे काम चोख अगदी.. जगदंब.. जगदंब..

जाधव: थ्यांक्यू हा.. पेपर घेतो आणि जातो..

भगवंत: (खिशावर हात ठेवत) या सायेब.. अशीच कृपा ठेवा..

(जाधव जोशीबाईंकडे जातात. बाई आपला लोकरीचा गुंडा बाजूला ठेवतात. ड्रॉवरमधून पेपर काढून देतात. समोरच्या रजिस्टरवर सही घेतात. जाधव पेपर बॅगेत ठेवून निघून जातात. )

परब: कुळेसाहेब.. या आता बाहेर.. ऑल क्लियर.. गनीम गॉन..

(कुळे केबिनमधून प्रकटतात. )

कांबळे: कसे काय आहे ते हेडॉफ्फिस्स कुळे?

कुळे: अति उत्तम.. अतीच उत्तम! भन्नाट कल्पना आचार्य! भगवंताची कृपा आहे!

आचार्य: हे अगदी शंभर टक्के खरे बोललात! सारी भगवंताची कृपा.. त्याच्या इच्छेशिवाय झाडाचे पानही हलत नाही.. आणि त्याच्याच इच्छेने वारे वाहतात.. त्याच वाऱ्याने पेपर उडून जातात.. ते उडून जाऊ नयेत म्हणून.. वजन तर ठेवावेच लागते! सारी त्या भगवंताची लीला.. !

जोशी: खरंय आचार्यजी!

(सगळे आकाशाकडे पाहून नमस्कार करतात.. )

## ६ मोरेश्वर पंडितांचे प्रमोशन आणि शंकर भगवान

"भगवान, आजतक मैंने आपसे कुछ नही मांगा, लेकिन आज.... आज कुछ मांग रहा हूं" गाभाऱ्यातले शंकर भगवान दचकले, हा डायलॉग त्यांनी आधी ऐकलेला. एका गणेशोत्सवात समोरच्या मंडपात लागलेल्या सिनेमात. तो कुणी अमिताभ बच्चन होता म्हणे. प्रत्यक्ष अमिताभ इथे? पण हा तर अमिताभ बच्चनचा आवाज नाही वाटत. हा कोण? भगवानांनी स्मृतीकोशाला ताण दिला. त्यांना आठवले, मागच्या वेळी गिरगावातल्या देवळात गणपती बाप्पा समोर हाच डायलॉग मारताना आणि काही दिवसांनी त्याच्या पुढे १ किलोभर पेढे चढवताना ह्याच मनुष्यास त्यांनी पाहिले होते.

मोरेश्वर पंडितांची ही आयडिया होती, दरवेळी नवीन देवापुढे मागणी करायची. म्हणजे 'मैंने आजतक कुछ नही मांगा' म्हणता येतं. नवीन देव म्हणजे नव्या ठिकाणी असणारा देव. मनुष्यप्राण्याच्या कृपेने अशा देवांची काही कमी नव्हती. शंकरभगवानांना आता या भक्ताची चेष्टा करायची लहर आली.. म्हणाले,

"वत्सा, मागच्या महिन्यातच हा डायलॉग मी ऐकला होता तुझ्याकडून. त्या गणपतीबाप्पासमोर. "

पंडित एकदम अविचल उभे राहिले. देवासमोरही न डगमण्याइतकी कातडी कमावलेली त्यांनी आजवरच्या नोकरीत. त्यांच्या त्या मागच्या मागण्या खऱ्याच होत्या. शंकरास कसे कळले? कदाचित गणपतीने बाबांना सांगितले असावे आणि काय त्याबद्दल! क्षणात सावरून म्हणाले,

"भगवान, इस महिनेमे मैने आजतक आपसे कुछ नही मांगा. लेकिन आज कुछ मांगने आया हूं. इस बार जो प्रमोशन हो जाय तो पूरा एक किलो पेढा चढाऊंगा. "

आपल्या क्विक थिंकिंग वर पंडित खूश. लेटर एडीटिंगची ऑफिसातील कारकुनी सवय इथे उपयोगी पडली होती! तर हा मराठी माणूस हिंदीत डायलॉग का मारतोय हे भगवानांना कळेना.

"वत्सा, दरवेळी नुसते पेढेच का? दुसरे काही का नको? आम्हाला नाही वाटत की काही तरी चमचमीत खावे? पाणीपुरी नाहीतर भेळपुरी, बटाटावडा नाहीतर समोसा तरी. दरवेळी गोड खाऊन कंटाळा आलाय नुसता. "
शंकर भगवानांपासून क्लू घेऊन पार्वती म्हणाली, "मी पण हे खरेखुरे दागिने सांभाळून थकलेय, आम्हाला नाही वाटत काहीतरी नवीन आर्टिफिशियल दागिने घालावेत? नवीन नवीन डिझाईनच्या साड्या घालाव्यात. "
"खरेय, आणि दरवेळी आमच्या पुढे नारळ फोडून नारळपाणी. आम्हाला नाही वाटत कधी थम्स अप नाही तर पेप्सी किंवा मिरांडा प्यावे. कोणी उघडतो का आपल्यापुढे थम्सपची बाटली? आपल्याला न विचारताच दरवेळी पेढे नि मिठाईच नुसती. " इति भगवान.
"ठीक आहे भगवान, यावेळी जरा सांभाळून घ्या. येवढे प्रमोशन होऊ द्या. मग  पाणीपुरी चढवीन तुम्हाला. चांगली सोन्याची बरं!" पंडित आश्वासन देत म्हणाले.
"अरे, ती काय खाता येईल का? खरीखुरी तुम्ही माणसे खाता ती आण. " भगवान म्हणाले नि पंडित चक्रावले. यावेळी हे काय आक्रीत, प्रत्यक्ष भगवानच काहीतरी मागतायत. पंडित गोंधळले, घाबरले आणि पटकन बाहेर पडले.

पंडितांना नेहमी आश्चर्य वाटायचे, ५० मुलांच्या वर्गात शिक्षक एकेका कडे लक्ष देऊ शकत नाहीत तर हा देव प्रत्येकाकडे individual attention कसा देत असेल बरे? त्यात ३३ कोटी देव आणि १०० कोटींवर भक्तगण असले तरी सर्व वर्कलोड मुख्य १०-१५ देवांवरच येत असणार. परत फेडलेल्या नि न फेडलेल्या नवसांचा हिशोब आणि त्यावर जी काही ॲक्शन घ्यायची ती ठरवायची. कितीतरी कठीण काम, कदाचित कॉम्प्युटराज्ड असेल ही सगळे कुणास ठाऊक. असो, असेल काही म्हणून ते प्रमोशन ची वाट पाहू लागले.

*****

इकडे 'कैलास टाइम्स' मध्ये दुसऱ्यादिवशी पहिल्याच पानावर बातमी.

‘शंकर भगवानांची प्रमोशनच्या बदल्यात भक्तांकडून पाणीपुरीची मागणी. नारद मुनींनी केलेला पर्दाफाश’
असा मथळा देऊन त्यात आदल्या दिवशीच्या पंडित आणि भगवानांच्या संभाषणाचा दाखला होता. पुढे ही अनुचित प्रथा आता पृथ्वीवरून स्वर्गात येत असल्याबद्दल काळजी व्यक्त करून स्वयं विष्णूभगवानांनी यात लक्ष घालावे असे म्हटले होते. आजवर भक्तगण नवस बोलतात तो आपल्या मर्जीने, त्यात ते काम होवो वा न होवो कधीच आपल्यावर ठपका येत नाही पण आता आपणच मागणी केली तर भक्तांच्या साऱ्या योग्य वा अयोग्य मागण्या मान्य करण्याचे बंधन येऊन स्वर्गाची स्वयंपूर्णता नष्ट व्हायची भीती अग्रलेखात व्यक्त करण्यात आली. या बातमीने देवलोकात एकच खळबळ माजली.

विष्णू भगवानांनी शंकर पार्वतीस पाचारण केले.
"काय आम्ही वाचतोय ते खरे की काय?" विष्णूभगवानांनी विचारले.
"भगवन.. सत्य असत्य आपणास ठाऊक असतेच. त्यामुळे यामध्ये आम्ही केवळ गंमत केली हे ध्यानात आलेच असेल.. "
"आणि भगवन, गणेशाची पृथ्वीतलावर भेट असते दहा दिवस.. त्याने तिथल्या सांगितल्या गमती जमती त्यावरून.. " पार्वतीने खुलासा केला.
विष्णू भगवानही म्हणाले, "पेपरवाले काहीपण छापत असतात. "
भगवान विष्णूंचे समाधान झाले आणि त्यांनी यावर पुढे काहीच ॲक्शन न घेण्याचे ठरवले.

मग कैलास टाइम्स मध्ये दररोज तोच विषय. तिसऱ्या दिवशी यात विष्णू भगवानांचे आणि लक्ष्मीदेवींचे पण नाव गोवण्यात आले तसे चौकशी समिती स्थापन करण्याचे भगवान विष्णूंना ठरवावेच लागले. ब्रह्मदेवाकडे त्याचे अध्यक्षपद आले. समिती स्थापन झाली आणि कैलास टाइम्स शांत झाला. नशीब पृथ्वीतलासारखी बातम्यांची चॅनल्स नाहीत असे गणेशाच्या मूषकाने गणेशास सांगितले. स्वर्गलोक असो की पृथ्वीलोक चौकशी समित्या नेहमीच आपल्याच गतीने काम करतात. त्यामुळे सारं काही शांत शांत झाले.

इकडे विष्णू भगवानांना मात्र वाटले की प्रत्यक्ष शंकर भगवानांनी या प्रकरणात नेमके पृथ्वीतलावर काय सुरू आहे ते पाहावे. त्यांनी सुचविले की उभयता जाऊन प्रत्यक्ष पाहावे म्हणजे आपणास खरा अंदाज येईल. प्रत्यक्ष विष्णूची आज्ञा.. शंकरभगवानांना जाणे भाग होते. त्यांच्या शिवलिंगे आणि अमरनाथासारखी देवळे यांचा तात्पुरता चार्ज नंदीकडे सोपवण्यात आला. आणि शंकर पार्वती दोघांनी पृथ्वीतलाकडे प्रस्थान केले.

*****

पंडितांच्या घरी दोघे पोचले तेव्हा पंडित आणि त्यांची बायको यांचे भांडण चालू होते. तावातावाने.. गंमत म्हणजे बोलणेही त्या नवसाबद्दलच होते! दोघे कान देऊन ऐकू लागले..

पंडितांची बायको: किती वेळा तुम्हाला सांगितलंय मी एवढ्या तेवढ्यावर नवस बोलू नका. देवाला काय वाटेल तुमच्या बद्दल

पंडित: मला एवढा खुळा समजू नकोस बरं, मी दरवेळी नवनवीन देवाकडे नवस बोलतो म्हणजे कोणाला काही कळत नाही. आता यावेळी थोडा घोटाळा झाला खरा. मागच्या वेळी माझ्या बॉसला हटवायसाठीचा नवस गणपतीला बोललो तर बाप्पाने बहुधा शंकर भगवानांना हे सांगितले असावे.

बायको: आणि ते पाणीपुरीचे काय म्हणत होतात?

पंडित: काही नाही बहुधा भास झाला असेल मला. नाहीतर देव कधी काही मागतो का भक्ताकडे?

बायको: देवाने जे मागितले ते द्याल का तुम्ही? देवाला काही न मागता फक्त भक्ती करणारे भक्त हवेत म्हणतात साधुसंत.

पंडित: तुझे वेगळेच काहीतरी. असे देव काही बाही मागू लागणारच नाही बघ नाहीतर त्याच्याकडे कोण पाहिल ढुंकून देखील? आणि आम्ही सरकारी नोकर फार स्मार्ट असतो. कोणाला कसे मॅनेज करायचे आम्हाला नीट समजते. आमचा मागचा बॉस तसा काही फार वाईट नव्हता पण तो गेल्याशिवाय कसे मिळणार प्रमोशन? बोललो झालं नवस. काय आवाज काढला सांगू गणराया समोर. नक्कीच इंप्रेस झाले असणार नाहीतर दुसरे काहीच न करता त्याची बरी बदली झाली असती? गणरायांनी सिंगलहँडेड

करवली ती बदली. पण यावेळी काम थोडे कठीण आहे. नुसतंच नवसावर अवलंबून चालायचं नाही.
बायको: म्हणजे काय करणार तुम्ही?
पंडित: काही नाही गं आपलं मी असंच म्हटलं.

पृथ्वीवर पोहोचताच असे ऐकावे लागले शिवपार्वतीस. आणि यावेळी फक्त भगवानांवर विसंबून चालायचे नाही म्हणजे? नवसाखेरीज अजून दुसरा कोणता मार्ग असावा? पार्वती विचारात पडून शंकरास म्हणाली.. "तुमच्या ध्यानात येतेय का? या पंडिताच्या मनात अजून काही आहे.. "
"खरंय उमे.. जे जे होईल ते पहावे.. आणि काय. "
थोडावेळ घुटमळून पंडित आपल्या आतल्या खोलीत गेले बायकोच्या नकळत.
"चल त्या खिडकीतून पाहू"
म्हणत दोघे दुसऱ्या खिडकीबाहेर उभे राहिले.
शंकरपार्वतीने पाहिले.. पंडितांनी दार नीट लावून दोन बॅगा काढल्या आणि कुठल्याशा कोपऱ्यातून कागदाची काही बंडले काढून बॅगेत भरली. आणि 'मी चाललोय गं' असे म्हणून हातात बॅग घेऊन बाहेर पडले देखील.

ताडताड टांगा टाकत पंडित निघाले. मागोमाग शंकर नि पार्वती. जाता जाता पार्वती भगवानांच्या कानात पुटपुटली,
"भगवान. गणराया म्हणत होता ती पृथ्वीवरची सर्वात महत्त्वाची गोष्ट हीच असावी, द्रव्य असावे हे, गणरायापुढे खूप जमा होते, तो येताना बरोबर आणत नाही नाहीतर लोकं टाकणंच बंद करतील म्हणत होता. आपल्याहूनही ही चीज ताकदवान आहे म्हणे. म्हणजे हा मनुष्यप्राणी आहे ना त्याची त्यावरच सर्वात जास्त श्रद्धा आहे म्हणून म्हटले. नाहीतर रागावून कराल तांडवनृत्य!"
"नाही गं उमे.. " शंकर भगवान गळयातल्या सर्पाची वेटोळी अॅडजस्ट करत म्हणाले,
"बरं बरं. चल लवकर. पाहू तर हा कोठे जातोय ते. "
दोघं पंडितांच्या मागोमाग पोहोचले एका इमारतीत. तिथल्या एका लिफ्ट मध्ये पंडित चढले नि निघून गेले..
"हे काय आहे भगवान.. "

"काही ठाऊक नाही.. पण हा पंडित त्यात निघून गेला बघ. एवढ्या मोठ्या बिल्डिंगीत याला कोठे शोधणार?"

"तरी मी म्हणत होते.. लवकर चला.. "

"हुं.. तू म्हणालीस ना लवकर चला ते.. खरेय तुझे.. चल इथेच पाहू वाट. "

"हुं.. पाहूया. पण भगवान, तुमच्या दिव्यदृष्टीने तुम्हाला दिसले का बॅगेत काय काय होते?"

"अगं उमे, या मानवाने आपल्या लक्षात येऊ नये म्हणून अशी बॅग बनवली असावी.. आणि आपण पाहिली ना ती कागदाची बंडले. तू म्हणालीस ते खरे, हेच ते द्रव्य असावे.. धन किंवा पैसा म्हणतात ते. "

काही वेळ असाच गेला. पार्वतीने शंकर भगवानांचा डमरू तोवर साफसूफ पुसून घेतला. जटांमधून गंगेचा ओघ थोडा मंद झालेल्यासारखा वाटत होता. हलक्या हाताने त्याचे आऊटलेट साफ केले तशी गंगा परत जोरात प्रकट झाली. मग  त्रिशूळाची टोके गंगेच्या पाण्यानी स्वच्छ केली. सापाच्या नवीनच कात टाकलेल्या कातडीस पुसण्याच्या बेतात असतानाच अचानक पंडित बाहेर पडले. जाताना हातात असलेली ती बॅग आता नव्हती. घाईघाईत पंडित निघाले नि त्यांच्या मागे शंकरपार्वती. पोहोचले ते परत पंडितांच्या घरी.

"बघा.. तुमच्या वेंधळेपणामुळे काय नक्की घडले हेच नाही कळले. आता विष्णूभगवानांना काय उत्तर देणार?" पार्वतीने आपली पत्नीपदाची सत्ता गाजवत म्हटले. शंकरभगवान काही म्हणण्याच्या बेतात होते तोच पंडित दुसरी बॅग घेऊन परत घाईघाईत बाहेर पडले.

"चला भगवान. आणि परत जर तशी लिफ्टबिफ्ट असली तर बघत नका बसू नुसते.. " जणू पार्वती रोज त्या लिफ्टनी जात असावी अशा थाटात म्हणाली.

दोघे पंडितांच्या मागोमाग पोहोचले ते त्याच इमारतीत. पंडित लिफ्टमध्ये शिरले नि चपळाईने शंकरपार्वती त्यांच्या मागोमाग आत शिरलेच.

'उमेशकुमार गुप्ता' अशी पाटी नि पुढे कुठल्या अगम्य भाषेत त्यांचा हुद्दा लिहिला असावा.. अशा केबिनमध्ये पंडित शिरले नि त्यांच्या मागोमाग शंकरपार्वती.

पंडित नि गुप्ता एकमेकांशी काय बोलत  असावेत? "ही भाषा ओळखीची नाही वाटत.. " पार्वती कुजबुजली..

"हुं.. असणार.. आंग्ल की कुठली तरी.. बघ पंडित कसा हसतोय.. "

"हसतोय कसला.. लाचारीचे हसू वाटतेय"

"हुं.. बघ ती बॅग गुप्ताकडे दिली बघ.. हिच्यात पण तेच द्रव्य असावे.. "

पंडित हसत हसत बाहेर पडले नि त्यामागोमाग शंकरपार्वती!

"ऐक.. उमे.. मला समजले हे काय आहे ते.. कळले का उमे तुला, अगं हा माणसाने माणसाला बोललेला नवस आहे. फक्त फरक इतकाच की देवाचा नवस काम झाल्यावर फेडतात आणि हा काम व्हायच्या आधीच!"

*****

या इतक्या प्रवासाने असेल की एकूणच जे पाहिले त्याचा परिणाम असेल.. परत जाईपर्यंत दोघे दमून गेले. तरीही विष्णूभगवानांना रिपोर्ट द्यायला दोघे गेले. त्यांना सारी हकिकत सांगून शंकर भगवान म्हणाले, "भगवन, झाले हे असे झालेय. काही करून त्या पंडितांचे प्रमोशन थांबवा. नाहीतर त्याला वाटेल आम्हीच त्यास मदत केली. "

"खरेय शिवा.. " विष्णूभगवान म्हणाले. "पण आता आपल्या हाती काय आहे?"

"कदाचित कोणाचे हृदय परिवर्तन केल्यास?" पार्वती भाबडेपणाने म्हणाली आणि भोळ्या सांब शंकरभगवानांना त्याही स्थितीत हसू आले.

"असली हृदये बदलण्यासाठी नसतात उमे.. तुला या मानवाची रीत नाही ठाऊक ना.. "

"यमराज.. " विष्णू भगवान हाक मारीत  म्हणाले. तसे यमराज आपला रेडा घेऊन आले.

मग यमराजांनी रेकॉर्ड तपासला. त्यानुसार पंडिताची आयुष्याची दोरी अजून पंधरावर्षे लांब होती.

"आपण यावे यमराज.. " विचारात पडत विष्णूभगवान म्हणाले नि रेड्यावर स्वार होऊन यमराज आपल्या कामाला निघून गेले.

"एक सांगू भगवन.. "

"बोला पार्वतीदेवी.. "

"भगवन.. जे काम तुमच्याने कठीण वाटते ना ते लक्ष्मीदेवींस सांगावे.. "

"ही कल्पना चांगली आहे उमे.. हुशार खरी!"

"पार्वतीदेवी, तुम्ही म्हणता ना ते खरेय.. ज्या द्रव्यलोभाने हे घडतेय त्याच द्रव्याची भीती दाखवली तर.. लक्ष्मीदेवीच हे काम करील. आणि आता तुम्ही निर्धास्त जा. कैलासावर विश्रांती घ्या. एकदा हिने म्हणजे लक्ष्मीने लक्ष घातले की काम झालेच समजा.. एकदा त्या ऑफिसमधल्या दोघांना लक्ष्मीदेवींची भीती पाडली की मग सारेच सोपे.. यावे आता आपण. "
शंकरपार्वती निघून गेले नि:शंक मनाने. लक्ष्मीदेवीने मनात आणले तर कोणाचे काहीही होऊ शकते यात काय शंका?

लक्ष्मीदेवीने मग त्या दोन जणांचा शोध घेतला. त्यात एक होते संभाजी काकडे नि दुसरे उमेश गुप्ता. मग लागलीच कामाला लागल्या त्या आणि रोज दोघांच्या स्वप्नात दर्शन देऊ लागल्या. कधी दोघे त्यात तुरूंगात खडी फोडत तर कधी पोलिसांच्या गाडीत चेहरा झाकून बसत. एकदा तर काकडे हार्ट अटॅक येऊन हॉस्पिटलमध्ये पोहोचले स्वप्नात. एकात गुप्ता आपल्या मुलाच्या शाळेत.. त्याच्या हातावर लिहिलेले मेरा बाप चोर है दाखवत.
स्वप्नांच्या मालिकेने दोघे मनोमन घाबरले. एकूणच याचा संबंध पंडितांच्या त्या बॅगेशी असावा असे ध्यानात आले नि
काकडेंनी गुप्तांना सकाळसकाळी फोन लावला..
"क्या गुप्ताजी क्या बातमी है?"
"काकडेजी, इतनी सुबह सुबह कैसे याद किया?" गुप्ता जांभई आवरत बोलले.
"अरे ओ प्रमोशन का प्रकरण है ना मोरेश्वर तुकाराम पंडीत का उसके बारेमें कुछ.. "
पंडितच्या प्रमोशन बद्दल काहीतरी म्हटल्यावर गुप्ता ताडकन झोपेतून जागे झाले.
"हां, बोलो. मुझे दो दिन से बुरे सपने आ रहे हैं शायद इसी बारे में हो काकडॆजी. "
"हां मुझेभी बहुत भीती वाट रही है. वही तो कह रहा हूं. इतने साल में ये ऐसा कभी नही हुआ बाबा. "
"एक काम करिए.. आजही मिलकर सोचते हैं कुछ.. "

दोघांची भेट लवकरच झाली. दोघांतील सरकारी अधिकारी जागा झाला. गुप्ताजी आपले कौशल्य दाखवत म्हणाले,

"पहिले ये देखो कि सीसीटीव्ही मे तो कुछ नही है ना रेकॉर्ड. "

"अरे.. गवरमेण का सी सी टीवी आदा टैम तो बंद रैता.. "

"हां काकडेजी. वही तो एक सहारा है.. "

काकडेंचा विश्वास अर्थातच अनाठायी नाही. त्यापाठी कित्येक वर्षांचा अनुभव आहे सरकारी कामाचा. सीसीटीव्ही बंदच असतो आणि दोघे सुटकेचा निश्वास टाकतात. काकडे पुढचा विचार करत म्हणाले,

"अरे गुप्ताजी, हमको अब आगेका विचार करना है.. कही वो पंडितने कुछ स्टींग बिंग तो नही ना किया होगा?"

"किया तो कैसे मालूम पडेगा. नही तो हम उसका पैसा वापस कर दें?"

"अरे नहीं, नहीं.. मैंने तो वो पंचावन्न इंच वाला मोठा टीव्ही पण बुक कर डाला है.. मेरा बच्चा कबसे मागे लगा था.. "

"हां और लक्ष्मी को वापस लौटाना भी अशुभ है ना?"

दोघे विचारात पडले. एकाएकी काकडे काही समजल्यासारखे म्हणाले,

"देखो गुप्ताजी, अगर वो स्टींग करता है तो तोंड तभीच खोलेगा जब हम उसे प्रमोशन नही देंगे.. "

"मतलब?"

"अरे गुप्ताजी.. अगर प्रमोशन दे देते है, तो वो तो चूप ही बैठेगा ना. "

"सही कहा.. "

"फिर तोंड खोला तो खुद ही गोतेमे आएगा नं"

"बिल्कुल सही कहा आपने. आप जैसे सीनियर अफसर से यही सीखना चाहिए. इसका मतलब है कि उसे अभी प्रमोशन तो देना ही पडेगा. फिर हम लोग सेफ. और ऐसे भी सपनोंकी ही तो बात है. इतना हम लोग डरेंगे तो देश की सेवा कैसे कर पाएंगे काकडेजी. " गुप्ताजी बोलले आणि सकारात्मक मान हलवत काकडे म्हणाले,

"सही कहा आपने गुप्ताजी. "

*****

कैलास पर्वतावर शंकर पार्वती निर्धास्त बसलेले. विशेषत: पार्वतीला विश्वास होता.. देवीला दिलेले काम, त्यात चूक होणे संभवच नाही.
तर एके दिवशी गाभाऱ्यात भर दुपारी आवाज आला नि शंकर भगवानांची समाधी भंगली
"कसला आवाज गं उमे.. "
समोर पंडित उभे. हातात पाणीपुरीचे पॅकेट आणि एक कोल्डड्रिंक्सचा क्रेट! नवस फेडण्यावरून त्यांची नि भटजीबुवांची बाचाबाची सुरू होती.
"असला नेवेद्य? शिव शिव.. कधी असा नैवेद्य नाही पाहिला आम्ही.. अशाने बाटेल हों आमचे मंदिर.. " भटजी तारस्वरात ओरडत होते आणि खुद्द शंकर भगवानांनीच हे मागितले यावर पंडित ठाम होते!
"अहों.. क्षणभर मानून चालूया.. शंकर भगवान बोलले तुमच्याशी.. पण असली मागणी?"
आवाज ऐकून एक सीनियर भटजी आले. सारा प्रकार समजून घेत म्हणाले, "अहो पंडित, देव कुणाची कशी परीक्षा घेईल याचा नेम नाही. त्यात परत हे शंकर भगवान. नसती परीक्षा पाहू नका. वहा हे सारे पण एका सोन्याच्या पाणीपुरी बरोबर. जा.. लवकरच फेडा तो नवस! अशा कार्यात उशीर नको बरे!"
प्रमोशनच्या फायद्यापुढे सोन्याची पाणीपुरी काही फार तोट्याचा सौदा नव्हता. उगीच रिस्क कशाला म्हणून पंडितांनी सोन्याच्या पुरीबरोबर नवस फेडला. सगळीकडे आनंदी आनंद झाला. सोन्याच्या प्राप्तीतून भटजीगण खूष आणि प्रमोशन मुळे पंडित तर खूपच खूष.

फक्त गोंधळात पडले ते गाभाऱ्यातील शंकर नि पार्वती. ब्रह्मा, विष्णू आणि महेश विचारात पडले. डोके खाजवूनही काही निष्कर्ष निघेना. शेवटी लक्ष्मीदेवी म्हणाल्या, "या साऱ्यातून शेवटी एकच निष्कर्ष निघतो, जन्म आणि मृत्यू अजून तरी आपल्या हातात आहे. पण पाप आणि पुण्याचा हिशोब अकाउंट बंद करताना म्हणजे एखाद्याच्या मरणानंतरच. त्या जन्म मृत्यूच्या दोन टोकांतल्या आयुष्यामधे कोणी काय करावे यावर आपले काय नियंत्रण आहे? हा मनुष्यप्राणी कायकाय करील ते पाहावे नुसते. बाकी आपल्या हातात आहे तरी काय?"

# ७ ‘मी’, ‘तो’ आणि चोरी!

‘मी’

लिहायला बसला की ‘मी’ ची छान तंद्री लागते. एका पानावर चार शब्द लिहिले की त्यातले दोन खोडले जातात. कधी तर वाक्येच्या वाक्ये गाळली जातात. ‘मी’ च्या कथेतील पात्रे ‘मी’ च्या हुकुमानुसार वागू लागली की ‘मी’ ला बरे वाटते. नायक, नायिका आणि त्यांचे खल counterparts गरजेनुसार तालावर नाचायला लागतात. अशी पात्रे नाचवणे हे कठपुतलीच्या खेळाप्रमाणे आहे हे खरे पण एकदा जमले की छान !

‘मी’ चे नायक नायिका कधी भांडभांड भांडतात तर कधी प्रेमाचा ओव्हरडोस घेतात. खलनायक वगैरे ‘मी’ जास्त आणत नाही तसा. एकतर प्रत्येक माणूसच तसा ‘ग्रे’ असतो असे ‘मी’ ला वाटते त्यात कोणाला काळा रंग कशाला फासा?

‘मी’ च्या तंद्रीत कोणी डिस्टर्ब केलेले ‘मी’ ला खपत नाही. सगळ्यांना सक्त ताकीद असते घरी. ‘मी’ च्या मुलीने तर 'काम चालू रस्ता बंद' अशी पाटीच बनवून घेतली आहे. तर मुलाने 'अपघाती क्षेत्र' अशी पाटी त्यावर कवटी आणि हाडांच्या चित्रांसकट अशी !

निस्सीम साहित्यसेवकाची अशी थट्टा होतच राहणार म्हणून ‘मी’ हे हसण्यावारी नेतो.. आणि न नेऊन सांगतो कोणास? या सगळ्यास त्यांच्या आईचा जो मनापासून पाठिंबा आहे!

‘तो’

‘त्या’चे सारेच जगाविपरीत. लहानपणापासूनच. पाळण्यात पाय दिसायला ‘तो’ म्हणॆ कधी पाळण्यात झोपलाच नाही. ‘त्या’च्या दांडगटपणा पुढे पाळणा तरी काय टिकाव

धरणार? शाळेतही 'तो' जगावेगळा. ज्ञान ते ज्ञानच, ते पुस्तकातून पेपरात कॉपी करून लिहिले म्हणून काही फार बिघडते असे 'त्या'ला वाटत नसे. हल्लीच्या 'कॉपी पेस्ट' चा उगम 'त्या'च्यापासूनच झाला असावा. हे विश्वची माझी मालमत्ता असा 'त्या'चा दृष्टिकोन तेव्हापासूनचा. चौर्यकर्म हे एक कर्मच आहे नि ते मनापासूनच करावे लागते ही 'त्या'ने लहानपणापासूनच मनावर बिंबवलेली शिकवणूक. स्वत:च स्वत:ला. तसा 'तो' सेल्फ मेड ! घराण्यात कोणी पुर्वसूरी नाही, परंपरा नाही. नाही म्हणायला 'त्या'च्या बाबांनी एकदा झाडावरचा पेरू चोरायचा प्रयत्न केलेला लहानपणी. तेव्हा तो झाड मालक ऐनवेळी आला नि त्यांनी झाडावरून इमर्जन्सी टाकलेल्या उडीने पायावर झालेल्या जखमेचे व्रण त्यांच्या मनावर मात्र जन्मभर टिकले असावेत. कारण त्या नंतर त्यांनी ते क्षेत्रच त्यागले. 'त्या'ने मात्र त्यातून योग्य तो धडा घेतला. 'तो' फोकस्ड होता लहानपणापासूनच. चोरी करणे ठीक पण पकडले जाणे चुकीचे. खूप विचारांती 'त्या'ने फूलप्रूफ चोरीची पद्धत शोधून काढली. आपले मार्ग 'त्या'ने स्वत:च शॊधले मग ते मार्ग कितीही वेड्या वाकड्या पायपावरून का जाईनात ! 'त्या'ने मग 'चोरी आणि शिरजोरी' काढली. चौर्यकर्मासाठी कंपनी ! 'तो'च तिचा CEO. 'त्या'च्या हाताखाली त्याची मोठी टीम. चोरीच पण कशी organised sector मध्ये. साध्या भाषेत त्याला टोळी किंवा गॅंग म्हणता येईल.

त्या दिवशीची गोष्ट

त्या दिवशी 'मी' असाच बसलेला. गोष्टीतली पात्रे कशी शहाण्यासारखी वागत होती. एक पहिलवान मुलगा मुलगी पहायला म्हणून आलेला तिच्या घरी. त्याच्याकडून तिच्या घरचे जड कपाट हलवून घेण्यासाठी मागे लागतात असा प्रसंग. मुलगा ते हलवून देतो तशी मुलीची आई म्हणते, "हा त्या मागच्या वेळेच्या मुलाहून बराय जरा, आणि पुढे संसारात असे सामान वगैरे हलवायचे प्रसंग खूप येतात तेव्हा हा पैलवान खरा कामाचा बाई. बघ पटते की नाही. असे जड सामानसुमान हलवणे फार अवघड असते नाहीतर !"

इथपर्यंत व्यवस्थित जुळत आलेली गोष्ट. पुढे काही लिहीतोय तोच..

'मी' च्या पाठीवर थाप पडली, आणि डोक्यावर थंड नळीचा स्पर्श झाला. 'मी' ला टक्कल चांगलेच पडलेय त्यामुळे नळी जरा जास्तच थंड वाटत होती.

"हॅंडस अप!" तो नळीवाला ओरडला.

"कोण तू? इथे कसा?"

‘मी’ बाजूचे इंग्रजी पुस्तक मिटत म्हणाला.

‘‘मी, शर्विलक"

"मी" चा रिटायर्ड शिक्षकी बाणा जागा झाला असावा.

"पूर्ण नाव सांगावे बाळा. नुसतेच नाव नाही, "

‘मी’ म्हणाला. तसा मागून हात आला. चांगलाच राकट होता. त्या हाताने आपले विझिटींग कार्ड ‘मी’ च्या समोर ठेवले.

चीफ शर्विलक
मॅनेजर (ऑपरेशन्स)
चोर आणि शिरजोर प्रा. लिमिटेड.

एवढेच त्या कार्डावर लिहिलेले. बाजूला एक बंदूकीचा लोगो.
‘मी’ त्या नळीसारख्या वस्तूस विसरला असेल. त्यामुळे झटकन मागे वळला. तो चीफ शर्विलक पण दचकला. त्याच्या हातातील ती थंड गोष्ट म्हणजे एक साधी नळी होती स्टीलची. बाकी तो मात्र चोरासारखाच चोर दिसत होता. आडव्या काळया पट्ट्य़ांचा टी शर्ट नि एक डोळा झाकणारी काळी पट्टी, गळयात रूमाल बांधलेला समोर गाठ असेल असा. ‘मी’ ने ती नळी पाहिली तसा ‘मी’ दचकला. तो काही बोलायच्या आत ‘मी’ म्हणाला,

"बस तिथे, चोरी बिरी नंतर कर. घरी असेही कोणी नाही. बस थोड्या गप्पा मारूया. "

"चुप्प ! मला माझे काम करू दे. काढ काही असेल ते. "

"काम काय रे नेहमीचेच आहे ते. आपण नेहमीच बिझी असतो ना. खरे सांगू तुझे व्हिजिटींग कार्ड मला आवडले फार. "
त्या स्तुतीने असेल पण त्याच्या चेहऱ्यावरचा ऊग्र भाव लोप पावला.
तो खरंच समोरच्या खुर्चीवर टेकला.

"अरे मी एक लेखक आहे. रिटायर्ड शिक्षकही. तुझ्याशी बोललो की मला नवीन आयडिया मिळतील. आणि माझ्या अनुभवाच्या कक्षा रूंदावतील. "

"काय रूंद होतील? आणि काय होईल?"

त्याला कक्षा वगैरे समजले नसावे. म्हणजे 'मी' ने समीक्षाही लिहावी का? कोणाला कळणार नाही असे शब्द 'मी' ला येतात की !

"काही नाही. तू तुझे काम आरामात कर पण आधी आपण जरा बोलू तर. "

तो नीट बसला.

'मी' ने विचारले, "काय रे ही नळी? बंदुकीऐवजी?"

"काय सांगू तुम्हाला आमची व्यथा? परवडत नाही खरी बंदूक, मंदी काय आमच्या धंद्यात नसते? आणि तुमच्या सारख्या शिक्षकाकडे येताना कशाला हवीय खरी बंदूक?"

तो 'मी' च्या घरी आला तेव्हाच कळत होते मंदी किती असेल नाहीतर एका शिक्षक-लेखकाकडे काय असणार असे डबोलं? क्षणभर तो च्या एका उघड्या डोळयात पाणी तरळल्यासारखे 'मी' ला वाटले.

"मला सांग. तू हा एक डोळा असा झाकून का ठेवतोस?"

"खरे सांगू? मला काही वर्षांपूर्वी वाचायची आवड होती फार. दिवाळी अंकातल्या चित्रांत चोरांचा युनिफॉर्म हाच असतो. म्हणून मी आमच्या कंपनीत हाच युनिफॉर्म ठेवलाय. "

"कंपनी?"

"येस. चोरी आणि शिरजोरी प्रायव्हेट लिमिटेड, मी प्रोप्रायटर. "

"हे खूपच इंटरेस्टिंग आहे रे. "

"अहो माझे वडिल लहानपणी पेरू चोरताना पकडले गेले. त्यांनी असा धसका घेतला की परत चोरीच्या वाटेस गेले नाहीत. मी त्यातून धडा घेतला. चांगलाच शिकलो मी त्यानंतर. "

"काय शिकलास? बंदुकीऐवजी नळी तर घेऊन फिरत असतोस. आणि शिकलास कितवीपर्यंत?"

"कितवी पेक्षा काय शिकलो हेच महत्त्वाचे. शिक्षणाने काय होतंय हो. मी शिकलो एवढेच की चोरी करणे वाईट पण पकडले गेलो तरच. मी आमच्या कंपनीत ट्रेनिंग देतो. आजवर पोलिसस्टेशन पाहिले नाही. सतरा वर्षांचा रेकॉर्ड आहे माझा. "

"सतरा वर्ष?"

"मग काय ! कॉलेज सांभाळून मी नवीन तंत्रे शिकलो. BA विथ मराठी आहे मी. "

BA ! ते ही मराठीतून. म्हणजे त्याला कक्षा वगैरे समजले असावे.

"मग तू भीत बित नाहीस?"

"भीती कसली? पण कंटाळा येतो कधी कधी. "

"कंटाळा?"

"अहो लोक काय घरी पैसा अडका नि दागिने ठेवतात काय? टाकतात लॉकरमध्ये. मग हे घर फोडा काय, शोधा काय, मेहनत वाया जाते ना. मेहनत किती? रात्रीची जागरणं, पायपावरून जाणं येणं, कुलूप तोडणे आणि हे सारं पोलिसांपासून सावधगिरी बाळगत. कधी वाटतं रिटायर होऊन घरी बसावं!"

"खरंय बाबा!"

'मी' ला एखाद्या गोष्टीच्या लेखनासाठी धुंडाळलेली पुस्तके नि त्यातून काहीच न मिळाल्यास होणारी निराशा आठवली.

तेवढ्यात तो उठून उभा राहिला.

"बंदूक नाही म्हणून मला असा तसा समजू नका लेखक राव. मी एकटाच भारी आहे. "

"बस रे ! तुझी मेहनत अशी वाया जाणार नाही पण खरं सांगू तुझा गृहपाठ चुकला. माझ्याकडे काही नाही तर लॉकरात काय ठेवू? तू शोध नि मिळाले तर फिफ्टी फिफ्टी वाटून घेऊया. "

"काय चेष्टा करताय माझी?"

"अरे, तू BA आहेस ना, तुला ठाऊक असणार दशा शिक्षकांची. "

"ते ही खरंच. पण माझा दिवस असा भाकड जाऊ देऊ? चल काढ तो मोबाईल नि घड्याळ. "

"घे बाबा !"

'मी' त्या दोन्ही गोष्टी काढत बोलला.

त्या गोष्टी हातात घेऊन पाहात तो म्हणाला,

"दुसरे काही नाही? एवढे जुने पुराणे घड्याळ नि हा सडेला मोबाईल. चल काढ पैसे नाहीतर तू आहेस नि मी आहे. "

"शांत नळीधारी शर्विलका शांत. जे नाहीच घरात ते मी कोठून पैदा करू? तू तुला हवे ते कर. "

त्याचा धीर सुटत चालला असावा.

"तुम्ही एवढे लेखक आणि असे कसे?"

"अरे लेखक आणि तो ही मराठी म्हणूनच असा. "

"ठीक आहे, आजचा दिवस माझा ऑफ समजतो, थोडा वेळ बसतो नि मग निघतो. "

"Thats like a good thief, बस. "

"एवढी सारी पुस्तके ! बाप रे ! इंग्लिश पण !"

"इंग्लिश, ती अशीच. "

"अशीच म्हणजे? किती झाली पुस्तके तुमची?"

"१५, आता हे सोळावे. ही इंग्रजी रेफरन्स ला. "

"कथा लेखनाला कसला आलाय रेफरन्स?"

त्याच्यातला BA मराठी जागा झाला असावा.

"काय आहे काही अडले, सुचले नाहीतर. थोडी लिंक किंवा क्ल्यू घ्यायचा. तुला म्हणून सांगतो, कधी कधी अख्खी गोष्ट देखील मिळून जाते. "

"चला, निघतो. माझी जागा चुकलीच. "

"निराश होऊ नकोस बाबा. "

"नाही तसे नाही. मला सांगा एक न्हावी दुसऱ्या न्हाव्याकडून पैसे घेतो का?"

"नाही, पण याचा संबंध?"

"किंवा एक डॉक्टर दुसऱ्याचा इलाज करताना पैसे घेतो का?"

"नसेल, पण याचा काय संबंध?"

"आहे संबंध आहेच. "

"मी शर्विलक"

"नुसता नाही चीफ शर्विलक!"

"तुम्ही पण शर्विलक"

"मी?"

"हे इंग्लिश इंटू मराठी? हे वाड. मय चौर्य नाही का? BA मराठी आहे मी, एवढे मला कळते. मग आपला उसूल आहे, चोराच्या घरी चोरी नाही करत. बाय, मी निघतो. "
तो सुळकन निघाला नि खिडकीच राजरस्ता असल्यासारखा पायपावरून बाहेर पडला.

'मी' पाहातच राहिला नि थोडा अंतर्मुख ही झाला.

# ८ दुराचाराच्या ताईताची गोष्ट

कुणीतरी मागे घोषवाक्य दिले, 'मेरा भारत महान. '

त्यावर कोणा श्रीमान सत्यवादीने समांतर घोषवाक्य बनवले,

'सौ में से नब्बे बेईमान फिरभी मेरा भारत महान'

आमची त्यामुळे फारच पंचाइत होतेय. आम्ही बाकीच्या बच्याकुच्या १० टक्क्यांतले अल्पसंख्यांक. हे असे मायनॉरिटीत आम्हाला ढकलायचे काम आमच्या शाळेने केले. आमची शाळा म्हणजे आदर्शवादी शिक्षकांनी चालवलेली आदर्श शाळा होती. आमच्या तेव्हाच्या शिक्षकांना जणू सद्गुणी मुलांचा कारखानाच उभारायचा असावा. त्यात आम्ही वेगवेगळे सद्गुण अंगी बाणवावे म्हणून प्रयत्न केले जायचे. त्या नकळत्या वयात शिक्षक सांगतील तेच खरे वाटायचे. त्यातून आम्ही प्रामाणिकता, सचोटी, सत्यवचनीपणा नि वक्तशीरपणा असे आजचे कालबाह्य गुण उचलले. ते पण कर्णाच्या कवच कुंडलांसारखे आम्हांला चिकटून बसले. त्या बाळकडूची कडू फळे आम्ही आजही भोगतो आहोत. लहानपणीचे संस्कार सहजी पुसून टाकले जाऊ शकत नाहीत हेच खरे.

प्रामाणिकपणाची आम्हांला अशी काही सवय लागली की सरकारी नोकरीत राहूनही आम्ही कोरडे ते कोरडेच आहोत. हिंमत ही अशी नाहीशी झाली आहे की कोणाकडे एक पैसा पण वरचे मागायला जीभ रेटत नाही, आमच्या बरोबरीचे लोक पहा कुठे निघून गेले. त्यांच्याकडे एक नव्हे तर दोन दोन गाड्या आल्या, दोन तीन घरे आली, बंगला आला. सारा काही आनंदी आनंद. नाहीतर आम्ही, साठी जवळ आली तरीही अजून वन बीएचकेच्या घरचे कर्जाचे हप्ते फेडतो आहोत आणि सेकंड हॅंड स्कूटरवर ये जा करतो आहोत. हे सर्व पाहिले की वाटते की काय भाव पडली ती शाळा नि शिकवणूक? त्या नव्वद टक्क्यांतील दहा टक्के पकडले जातात आणि त्यातील दहा टक्क्यांना काही शिक्षा होते. ती भोगून झाली की हे संपत्ती उपभोगायला परत तयार. आम्हाला शाळेने

प्रवाहाबरोबर पोहायचे शिकवलेच नाही  प्रवाहाविरूद्ध पोहणे म्हणजे ट्रॅफिकमध्ये गाडी उलट्या दिशेने चालवणे, अपघात होणारच. हे सर्व घडले त्या शाळेमुळे. आम्ही मग आमच्या शाळेला आणि ज्या कमनशिबाने आम्हाला त्या शाळेत जावे लागले त्या नशिबाला बोल लावत बसतो. दुसरं काय आपल्या हातात आहे? एवढेच नाही.. शाळेने आमची कशी पंचाईत करून ठेवलीय याचे उदाहरण देतो एकच.. आमच्या शाळेत आम्हाला वेळेचे महत्त्व शिकवले गेले. वक्तशीरपणा हा मोठाच गुण असल्याचे शिकवले गेले. वेळ वाया घालवू नये म्हणे. आम्ही वेळेचा पुरेपूर उपयोग करतो तर ऑफिसात साहेब आमच्यावरच सारी कामे ढकलतो. आणि परत बाकीचे किती unreliable आहेत यावर लेक्चर आम्हीच ऐकतो. कुणी वेळ दिली की आम्ही ती पाळल्याशिवाय राहात नाही, तशी वाईट म्हणा सवयच लागली आहे. मध्ये आम्हाला एका समारंभाचे निमंत्रण आले. आयोजक आमच्या ओळखीचे. तीन तीनदा फोन केला आणि म्हणाले 'नक्की या बरे, ठीक सात वाजता' त्यासाठी आम्ही दोन तासाचे स्पेशल कन्सेशन काढले धावत पळत ६. ५९ ला पोहोचलो तर तिथे आयोजकांपैकीच कोणी नव्हते तर बाकीच्यांची बातच नको. थांबलो. पावणे आठाला कोणीतरी आयोजकापैकी एकजण आला. म्हणाला, 'होईल सुरू साडे आठपर्यंत. ' कंटाळलो आणि निघून आलो. दुसऱ्या दिवशी त्या माझ्या आयोजक मित्राचा फोन आला. "काहो आला नाहीत?"
मी काय झाले ते सांगितले. त्यावर ते म्हणाले, "अहो सात वाजता म्हणजे साडेआठनवाला सुरू होतो, इंडियन स्टॅंडर्ड टाइम माहित नव्हे का तुम्हाला. "
'अगदी बावळटच आहात' हे शेवटचे वाक्य न बोलताही समजत होते. या वक्तशीरपणापायी बावळटपणाचा शिक्का लावून घेतला.

ते जुने दिवस होते विश्वासाचे. लोकांचा शाळेवर, शिक्षकांवर विश्वास होता. लोकांचा तसा सगळयांवरच विश्वास असायचा. इकडे शाळेत प्रामाणिकता, सचोटी, सौजन्य, वक्तशीरपणा, चांगल्या संगतीत राहावे, व्यसनांपासून दूर राहावे असे काहीकाही शिकवले जायचे आणि घरचे पण शाळेत मुलांचे व्यवस्थित शिक्षण होतेयना म्हणून गाफील राहायचे. घरी परत 'सदा सर्वदा योग तुझा घडावा' नि बाकी स्त्रोत्रे म्हणायची आणि रामायण महाभारतातल्या गोष्टी ऐकायच्या, तेव्हाच्या सिनेमात हीरो नेहमीच पोलिस असायचा अणि कधी चोर हीरो असलाच तरी दयाळू असायचा. आणि काही

झालं तरी अंती विजय पोलिसांचा व्हायचा. चोराला पण पश्चात्ताप व्हायचा. सगळीकडे सदाचारणाचे कसे पीकच आले असायचे. आमच्यात पण सदाचार असाच कॉंग्रेसगवतासारखा फोफावला होता. त्यात तो कधी outdated झाला याकडे कोणाचेच लक्ष राहिले नाही.

या सद्गुणांपायी आमची खरी पंचाईत होते ती नववर्षदिनी. लोकांना कशा छान छान वाईट सवयी असतात. काही चहाचे कपच्या कप घशाखाली घालतात तर काही पान तंबाखूच्या पिंका टाकतात. काहींना उशीरा उठायची सवय असते. काही धुम्रवलयात काळ व्यतीत करतात आणि काही एकच प्यालाचे अनेक प्याले रिचवतात. आम्ही सकाळी रोज लवकर उठतो, चहा काही जास्त पित नाही, आणि बाकीच्या वाईट सवयींपासून तर दहा हात दूर. आता नव वर्षदिनी सोडायचे तर काय सोडायचे? इतरांचे बरे असते त्याच त्याच सवयी नववर्षदिनी परत परत सोडता येतात पण आम्ही अल्लाघरची गायच जणू!

हे सर्व उफाळून यायला निमित्त झाले ते आमच्यापेक्षा ज्युनियर मनोहर लोखंडेला प्रमोशन मिळण्याचे. आणि या सदाचाराचा आम्हाला फार त्रास होऊ लागला. दिवसरात्र आम्ही बाकीच्यांसारखे स्मार्ट झालो अशी स्वप्ने आम्ही पाहू लागलो. या सदाचाराच्या विळख्यातून बाहेर पडून मुख्य प्रवाहात यायची वारंवार इच्छा होऊ लागली. भलभलत्या सवयींचे वय उलटले तरी किमान रिटायर व्हायच्या उरलेल्या एका वर्षात आर्थिक उत्कर्ष साधून घ्यावा असे वाटू लागले. पण संस्कार तसे करू देत नव्हते. दादरच्या पुलावरील फेरीवाल्यांनी पोलिसांची गाडी पाहताच नाहीसे व्हावे आणि ती जाताच परत अवतीर्ण व्हावे तसे हे विचार थैमान घालू लागले.

आम्ही मग मनाशी काही ठरवून मनोहर लोखंडेच्या बंगल्यावर गेलो. मनोहर आमच्याहून सहा वर्षांनी लहान पण ९० टक्क्यांपैकी, ९० टक्क्यांना आपल्याकडे आरक्षण असते त्यामुळे भरभर वर चढत आमचा सीनियर झालेला. आम्ही आमची समस्या कथन केली. तसा मनोहर हसला. म्हणाला, "better late than never, अजून एक वर्ष बाकी आहे बघा जमेल तेव्हढे. "

आम्हाला ‘तेच’ जमत नाही असे सांगितल्यावर तो विचारात पडला आणि थोड्या वेळाने म्हणाला, "सापडला उपाय. अहो आपण त्या जाहिराती पाहतो ना, समस्याओं से परेसान हमारे पास है समाधान. त्या बाबा महमद शहा बंगाली कडे जाऊया. "

आम्ही घाबरलो. आमच्या छातीत सशाचे काळीज फीट झालेले आहे. बंगाली बाबा जादूटोण्याने आमचे कबूतर नाहीतर कोंबडा बनवेल अशी आम्हाला भीती वाटली. मनोहर मागेच लागला. आपल्या बिरादरीत अजून कोणी येतोय म्हणून एक्सायटेड असावा. त्यानेच बाबाची अपॉइंटमेंट घेतली.
आम्ही निघालो तर हिचा सद्गदित होत निरोप घेतला. काही बरेवाईट झाले तर आमच्या इन्स्पेक्टर मित्राला फोन कर म्हणून नंबर देऊन ठेवला. आम्हाला एखाद्या ऐतिहासिक कॅरॅक्टरचा भास होत होता. युद्धावरच निघालेत जणू.

कुठल्यातरी गल्लीत बाबाचे दुकान होते. आम्ही घाबरून बाहेरच बसलो. लोखंडे धीट. आत गेला. आतून बाबाचे मधून मधून हसणे ऐकू येत होते. त्याने पण अशी केस कधी पाहिली किंवा ऐकली नसावी. थोड्या वेळात तो बाहेर आला.
त्याच्या हातात एक ताईत होता. तो आम्हाला देत म्हणाला, "हा दुराचार का तावीज आहे, ३ घंटोंमे हमखास यश. "
हमखास शब्द बाबाचा नसावा.
मी गळयात घालण्याआधी म्हटले, "मनोहर, पण बाबाचे पैसे?"
मनोहर म्हणाला, "मी दिले. आता नीट वागा, कमाई करा नि मग माझे पैसे परत करा. त्यात मात्र बेईमानी नको. "
गळयात तो ताईत घालून घरी आलो. आम्ही हातीपायी धड आणि मनुष्यरूपात परत आलो ते पाहून ही पण निर्धास्त झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ऑफिसात जाऊन पहिले टेबल बदलून घेतले. बहुसंख्य वापरतात तसे पुढे फ्लॅप असलेले ब्राईब टेबल आणवले. त्याच्या फ्लॅप मधून टाकलेले पैसे डायरेक्ट आपल्या लॉकरात पडतात.
समोर पार्टी बसलेली. आजपर्यंत आमचा लौकिक वेगळा होता. पण त्या टेबलाकडे पाहात समंजसपणा दाखवत त्यांनीच विचारले, "किती?"
आम्ही ताईतावर हात ठेवत म्हणालो, "पन्नास!"

"पंचवीसचा रेट आहे, साहेब" म्हणत माझ्यासारख्या नवशिक्याच्या टेबलातून पंचवीस हजाराच्या नोटा सरकवल्या. त्यांचे पेपर सही करून त्यांच्या हातात दिले. पार्टी समाधानाने परत गेली. पैसे देऊनही एवढ्या पटकन त्यांचे काम कधी झाले नसावे.

ही आमची बिनकष्टाची पहिली कमाई ! वयाच्या एकोणसाठाव्या वर्षी. 'एवढी वर्ष वाया घालवलीत थू तुझ्या जिनगानीवर' असे आम्ही स्वत:शीच म्हटले. दिवस भरात अजूनही काही नोटा जमल्या. ती थप्पी खिशात घालून बाहेर पडलो. ताईत चांगलाच पॉवरफुल होता. दिवसभरात आम्ही आमच्या प्यूनशीही अजिबात सौजन्याने वागलो नाही, फोनवर बिनधास्त थापा पण ठोकल्या, दिवस भरात चांगला १०-१५ कप चहा पण झाला. एका हातानी थप्पी आणि दुसऱ्याने ताईत सांभाळत घरी आलो तर आम्हाला खूपच उशीर झाला होता. आमच्या वक्तशीरपणाचा असा अंत झाल्याचे पाहून आम्ही खूश झालो. ही म्हणाली, "अहो सामान आणायचे, फी भरायचीय मुलांची" आणि काय काय.
तिच्या हातात ५००च्या ४-५ नोटा कोंबत म्हटले, "जाव मजे करो. "
ही बघतच राहिली. पै-पै चा हिशेब करणारे आम्ही आमूलाग्र बदललो. मग बंगला आला, गाडी आली. ती गाडी एके दिवशी बाहेर काढली आणि भरधाव चालवत होतो तशी जोरात कोठेतरी ठोकली. दचकून आम्हाला जाग आली. आम्ही खाटेवर. हे हॉस्पिटल आहे की काय असे वाटले.

लोखंडाची खाट आणि वर खडखडणारा पंखा. हे सारे स्वप्नच होते तर. मी दचकून उठलेला पाहून ही म्हणाली, "काय झाले हो?"
म्हणजे हे नक्कीच स्वप्न होते. "काही नाही. झोप तू" मी तिला म्हणालो.

सकाळी हिला स्वप्नाबद्दल सांगितले. लोखंडेला आमच्या आधी प्रमोशन कसे मिळाले ते सांगितले. म्हटले अजून आम्ही कर्जच फेडतोय आणि लोखंड्या बंगल्यात राहतोय नि गाड्या उडवतोय.

आधी तर ही काहीच बोलली नाही. नंतर म्हणाली, "काय त्याचे कौतुक सांगताय, नुकताच डायबिटीस आणि हार्ट अटॅक नि ॲडमिट झालेला. बायपास पण झाली या वयात. "
"अगं पण कमीतकमी बायपासचे पैसे भरायची तर ऐपत आहे ना त्याची. "
लोखंडेचे प्रमोशन आमच्या जिव्हारी लागल्याचे हिच्या लक्षात आले असावे.
ती म्हणाली, "ठीक आहे. जा तुम्ही सोने सोडून त्या लोखंडाच्यामागे. मुले आहेतच. ती पण तुमच्या पावलावर पावले टाकतीलच त्या लोखंडेच्या मुलांसारखी. तुम्ही बसा ते पैसे मोजत. मी चालले माहेरी मुलांना घेऊन. "
लोखंडेची मुले दिवटी ह्या शब्दानेच वर्णन करावी अशी होती.

ही खरी हुशार आहे. कुठल्या शाळेत जायची विचारले पाहिजे. आमच्या इतक्या वर्षाच्या संस्कारांना फेल जाताना पाहून ही बरोबर जागी झाली.
आज रात्री आम्हाला खूप दिवसांनी खरी शांत झोप आली. हिचा अभिमान पण वाटला. हिंदी सिनेमा असता तर याच वेळी लोखंडेला पोलिस अटक करतायत असे दाखवले गेले असते. आजच्या स्वप्नात  कोणीतरी देव आला, कोणीतरी का, तर त्याला गणपतीची सोंड होती पण गळयात साप आणि पाठी दत्तासारखी गाय.
आम्हाला म्हणाला, "आम्ही दुनिया बनविली तेव्हा बनवायचे होते ते सारेच प्रामाणिक मनुष्य, पण हा प्राणीच असा बिलंदर की तो प्रत्यक्ष आम्हालाही फसवतोय अजून. पण अजून ही काही आहेत भले मनुष्य प्राणी या पृथ्वीतलावर. म्हणून तर हे जग टिकून आहे. त्यांची संख्या कमी पण त्यांच्या ताकदीपुढे बाकीच्यांचे काही चालत नाही. तेव्हा तुमचे तुम्ही ठरवा. "

ठरवायचे काय होते?
हिने तर आधीच आमचे डोळे उघडले होते.

# ९ तीन मडकी

( तीन मडकी नावाची साने गुरूजींची गोड गोष्टीत एक गोष्ट आहे. त्यात एका गरीब ब्राह्मणाला शंकर भगवान जादूचे एक मडके देतात. त्यातून तो श्रीमंत बनत जातो. पण ते मडके मुलांच्या हातून फुटते. शंकर भगवान दुसरे मडके देतात ते चोरीला जाते. तर तिसऱ्या मडक्यातून राक्षस बाहेर पडून ते राक्षस त्याला त्याचे चोरी गेलेले मडके परत मिळवून देतात. काळ बदलला. गरीबापेक्षा श्रीमंतच जास्त कुरकुर करायला लागला. जास्तच दु:खी व्हायला लागला. त्याचीही इच्छापूर्ती भगवान करतीलच ना? )

भरतपूर नावाच्या एका राज्यात एक गरीब बिचारा श्रीमंत माणूस राहत होता. रमणलाल त्याचे नाव. त्याच्याकडे स्वत:च्या २ गाड्या होत्या, रहायला बंगला होता अगदी स्विमिंगपूल सहित, बायको नि दोन मुलं होती. खाऊन पिऊन सुखी असला तरी रमणलालला काहीतरी सतत जाचत होते. त्याच्याकडे २ गाड्या असल्या तरी त्यातील एकही मर्सिडीस किंवा बी. एम. डब्लू. नव्हती. पैसा अडका असला तरी त्याला स्वत:चे हेलिकॉप्टर घ्यायला परवडत नव्हते. त्याचे काही प्रतिस्पर्धी लाल दिव्यांच्या सरकारी गाडीतून जाताना पाहून त्याचे हृदय कळवळत असे. आपल्या दु:खाने तो बेजार झाला होता. सतत एकच ध्यास..  तो म्हणजे काही करून हे सर्व मिळवायचेच. पण मार्ग काही दिसेना. करावे तर काय करावे?

अति निराश होऊन एके दिवशी सकाळी तो मंत्रालयाच्या बाहेरील झाडीत गुडघ्यात मान घालून रडत बसला. नेहमीप्रमाणे शंकर पार्वती आकाशातून चाललेले मॉर्निंगवॉकला!  पार्वतीच्या नजरेस तो पडला. तिचे हृदय कळवळले. ती शंकर भगवानांस म्हणाली, "भगवनऽ, हा कोण दु:खी माणूस आहे ते पाहून येऊ. सकाळ सकाळी अशी उदास माणसे पाहिली की मला कसेसेच होते. "

शंकर भगवान म्हणाले, "बरं उमे, पाहू या तर"
पार्वती हे तिचे कागदोपत्री नाव असले तरी शंकर भगवान घरी तिला उमा अशीच हाक मारतात!
दोघे येऊन रमणलालच्या पुढे उभे ठाकले.
'काय बरे हवे आहे तुला वत्सा? का तू इतका निराश दिसतोस?'
समोर प्रत्यक्ष शंकर पार्वतीला पाहून रमणलाल चक्रावला.
"शंकर भगवान आपण स्वत:?" वाकून दंडवत घालत रमणलाल म्हणाला.
मग स्वत:ला सावरून त्याने आपले दु:ख कथन केले.
शंकर भगवानांनी कुठलासा मंत्र म्हटला. आणि एक मडके त्याच्या हातात दिले.
म्हणाले, "वत्सा तुझे कल्याण असो. "
रमणलाल आ वासून पाहत असेपर्यंत शंकर पार्वती अंतर्धान पावले.

मडके आणि प्रत्यक्ष शंकराने दिलेले! काय असावे? आणि असले साधे मडके आपल्या बंगल्याच्या डेकॉरला शोभेल का असा विचार करीत रमणलाल घरात शिरला. हातात ते लाल मडके! ते पाहाताच त्याची बायको किंचाळली,
"शीऽ हे कसले मडके. काय डोकेबिके फिरले की काय हो? मी नाही ही घाण ठेऊ द्यायची माझ्या घरात. " ती दम भरत म्हणाली.
मुलं पण चक्रावली, हे काय बाबांचे नवे खूळ?
"पाहू, पाहू" म्हणून दोन्ही मुले ते मडके हातात घ्यायला भांडू लागली.
"अरे, अरे, पडऽ पडऽ पडेल"
रमणलाल ओरडला. काही झाले तरी प्रत्यक्ष भगवानांनी दिलेले मडके होते ते. चमत्कारी असणार ते!
आणि चमत्कार झालाच! त्याच्या त्या 'पड पड' बरोबर त्याच्या समोर कोळशाच्या खाणी उभ्या राहिल्या. रमणलाल हुशार. त्याला शंकर भगवानांचा संकेत कळला. आपले भाग्य आता ह्या कोळशाच्या खाणीत आहे हे त्याच्या लक्षात आले. कोळशाची नाही ती तर पैशाचीच खाण हे समजून रमणलाल खूश झाला. तरी 'श्शी! ही काय बाई काळी काळी कामे करायची' म्हणून बायकोने नाके मुरडली. 'रंगाने काळा असला तरी तो पैसाच!' रमणलाल मनाशी म्हणत कामाला लागला. काही दिवसांतच रमणलालचा

उत्कर्ष झाला. दाराशी बी. एम. डब्लू. आली. एक मर्सिडिस आली. आणि याच साठी केला होता अट्टाहास वाल्या हेलिकॉप्टरची ऑर्डरही त्याने दिली

सगळीकडे आनंदीआनंद झाला. बायको पण खूश होती. सारे सुखात चालू असतानाच गडबड झाली. म्हणतात ना 'दैव देते पण कर्म नेते' त्याप्रमाणे नवनवीन खाणी काढता काढता मुलांच्या हातून मडके खाली पडले नि फुटले.
आता रमणलालला मडकेच नाही तर नशीबच फुटल्यासारखे वाटले.
त्या हेलिकॉप्टरची ऑर्डर कॅन्सल करावी लागली. असल्या नामुष्कीने रमणलाल निराश झाला. साहजिकच ते. आता करणार काय?

विचार करकरून तो एके दिवशी परत मंत्रालयातील झाडीत गुढघ्यात डोके घालून रडत बसला. याच ठिकाणी त्याला उत्कर्षाची किल्ली मिळालेली! अजूनही काही मिळेल. देव दयाळू आहेच!
शंकर पार्वती नेहमी मॉर्निंग वॉकला निघत तसे आजही निघालेले. पार्वतीला दया आली. शंकर भगवानांनी लक्ष नसल्याचे दाखवत पुढे जाण्याचा प्रयत्न केला. पण पार्वतीचा हट्ट..
"'भगवन् ऽ, हा कोण दु:खी आत्मा आहे पाहूया तर खरे. "
शंकर भगवान म्हणाले, "अगं उमे, आपली विष्णू भगवानांशी अपॉईटमेंट आहे. उशीर होईल. "
पार्वती मात्र हट्ट्च करत म्हणाली, "तुम्ही या. नाहीतर मी काही तुमच्या बरोबर यायची नाही. "
स्त्री हट्ट्च तो. परत एकदा शंकर पार्वती रमणलाल पुढे उभे ठाकले. रमणलालने रडत रडत मडके आणि त्याबरोबरच नशीबही फुटल्याची हकिकत सांगितली.
पार्वतीला दया आल्यावाचून कशी राहिल? ती म्हणाली, "भगवनऽ ते दुसरे मडके द्यावे या गरीब बिचाऱ्यास. "
शंकर भगवान न ऐकून कोणाला सांगणार? मंत्र म्हणून आणि अजून एक मडके रमणलालच्या हाती देऊन ते अंतर्धान पावले.

रमणलाल खुशीने घरी आला. यावेळी काय असेल? मडक्यासारखे मडके ते. पण यावेळी बायको मडक्याला घाणेरडे नाही म्हणाली. मुलांनी मडकं हातात घेत म्हटले,
"बाबा यातून काय मिळेल?"
बायको म्हणाली, "यावेळी बहुधा सोन्याची खाण असेल. "
असे म्हणून मडके उपडे धरून 'पड पड' म्हटले तरी पण घडले काहीच नाही.
बायको म्हणाली, "काय हो नीट बघून नाही आणायचे का? डिफेक्टीव्ह वाटते"
रमणलालला वाटले, यावेळी फसवले की काय? तेही प्रत्यक्ष शंकरभगवानांनी?
पण नाही. तेवढ्यात त्याच्या दारावरची बेल वाजली. लालदिव्याची गाडी घेऊन चक्रमादित्य महाराजांचा दूत समोर उभा होता! महाराजांनी रमणलालला उद्योग आणि बांधकाम मंत्री बनवले. म्हणजे रस्ते बांधणी आणि टोल गोळा करायचा !

काही असो. रमणलालची बायको मंत्रीण बाई बनली. लाल दिव्याची गाडी आली. मग काय खरीच पैशांची खाण हाती लागली! हेलिकॉप्टर दारी उडू आणि झुलू लागले. रमणलालची आधीच गुणी असलेली दोन्ही मुले आणखी गुण उधळू लागली. अगदी हाताबाहेर जातेय प्रकरण पाहून चक्रमादित्यांसारख्या कधीच मंत्र्यांना हात न लावणाऱ्या महाराजांना देखील त्याची दखल घ्यावी लागली. रमणलालचे मंत्रीपद गेले. म्हणजे त्याला तातडीने काढून टाकावे लागले.

रमणलाल वैतागला. वेडापिसा झाला. परत परत मडके हलवूनही पाहू लागला. पण नाही..
मंत्रीपदावाचून रमणलालची स्थिती दात नसलेल्या वाघासारखी झाली. पण वाघच तो! तो काय गवत खाणार? रमणलाल परत उदास झाला. घरी बसून झुरू लागला. पूर्वाश्रमीच्या मंत्रीणबाई नैराश्याने घेरल्या गेल्या. रमणलाल दीनवाणा घरात बसू लागला. तर
एके दिवशी ती म्हणाली, "नुसते हातावर हात घेऊन काय बसलात ? जा जाऊन मागच्या वेळेसारखे रडत बसा. बघा एखादे नवे मडके मिळतंय का ते. जा कामाला लागा. "

रमणलालला हे सुचलेच नव्हते. अर्धांगिनीच्या सुपीक मेंदूबद्दल त्याच्या मनात अपार अभिमान दाटून आला. परत शिवपार्वती येतील? नव्याने कृपाप्रसाद देतील? जाऊन बघण्यास हरकत तर नाहीच. रमणलाल परत तिकडे झाडीत जाऊन रडत बसला.

नेहमी प्रमाणे मॉर्निंगवॉकच्या वेळी शंकर पार्वतीस रमणलाल दिसलाच. पार्वतीला वाटले, एवढे सगळे देऊनही हा का बरे रडत असावा?

पार्वती म्हणाली, "भगवनऽ, तुमचे तिसरे मडके देऊया या बिचाऱ्यास. "

शंकर भगवान म्हणाले, "उमे, यावेळी मला भरीस घालू नकोस बरं. "

पण पार्वतीच्या हट्टापुढे भगवानांचे काय चालणार ? परत जाऊन रमणलाल समोर उभे रहावेच लागले!

रमणलाल सरावल्याप्रमाणे भगवानांना म्हणाला, "भगवनऽ, आपण सर्वज्ञ आहात. पण मागच्या वेळचे मडके डिफेक्टीव होते. त्यातून मंत्रीपद परत काही मिळत नाही. "

"परत? म्हणजे?"

रमणलालला सर्व हकिकत सांगावीच लागली.

"मग आता काय हवे वत्सा तुला?"

"भगवान, असे वाटते ना की माझे भले इतरांना बघवत नाही. मला वाटते ज्यांनी ज्यांनी चूक केली त्यांना बदडून काढावे. "

"हे बघ, हे आता शेवटचे मडके आहे. हे अभंग आहे आणि तुझी साथ कधीच न सोडेल असे आहे. जो चुकेल त्याला शिक्षा करणारे हे मडके आहे. हवे असेल तर सांग. "

रमणलालचे डोळे चमकले.

"भगवनऽ, तुमच्या प्रसादास मी नाही कसे म्हणू?"

"तथास्तु! हे घे. "

असे म्हणून शंकर भगवानांनी तिसरे मडके त्याच्या हाती ठेवले आणि अंतर्धान पावले.

रमणलाल अधीरतेने घरी आला.

बायको आणि मुले वाटच पाहात होती. "अरे वा! मिळाले की तिसरे मडके!" उत्साहाने ती बोलली, "बघा रे पोरांनो काय आहे त्यात. परत ती लाल दिव्यांची गाडी मिळाली की सुटले बाई. ती गाडी गेल्यापासून ते गेटवरचे पहारेकरी पण सलाम करेनासे झालेत.

आणि काल तर एके ठिकाणी मला टोलही भरावा लागला. काय दिवस आले! आपणच इतके दिवस चालवायचो तो टोलनाका आता आपल्यालाच त्यावर पैसे भरावे लागत आहेत. "

जिथे फुले वेचली तिथे गोवऱ्या वेचाव्या लागाव्या अशा तालात एक्स मंत्रीण बाई कुरकुरत बोलल्या.

मुलेही उतावीळ झाली. मडके उलटे करून 'पड पड' म्हणू लागली. तसा एक राक्षस बाहेर पडला. त्याच्या हातात एक मोठी लाठी होती.

"नक्कीच हा चुगलखोरांना अद्द्ल घडवायला आला असणार. चुकीच्या लोकांना अद्दल घडवण्यासाठी मुद्दाम मागितलेय मी ते मडके. " असे रमणलाल म्हणता म्हणता तो राक्षस हातातील लाठीने चौघांना बदडत सुटला.

"बाबा, हे काय. वाचवा वाचवा. "

मुले जिवाच्या आकांताने ओरडू लागली.

"अहो हे काय आणले तुम्ही? ह्याला आवरा. " बायको ओरडली.

"अरे राक्षसा, हे काय चालू आहे? चुकून भगवानांनी हे मडके दिले आहे वाटते. शिव शिव शिव शिव" मार खाता खाता रमणलाल म्हणाला. आणि 'शिव शिव' असे म्हणताच राक्षस परत मडक्यात जाऊन बसला. सगळ्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. बायको म्हणाली, "उद्याच जा आणि मडके बदलून आणा. काही तरी घोटाळा दिसतोय नक्कीच. "

एवढे बोलून होतेय तोवर परत राक्षस बाहेर येऊन सर्वांना बदडत सुटला.

'शिव शिव' जप करताच तो परत मडक्यात जाऊन बसला. दर मिनिटामिनिटाला राक्षस बाहेर आणि शिव नामाचा जप होताच परत आत. असे चक्र चालू होते.

रमणलाची बायको वैतागली. आधीच लालदिव्यांची गाडी गेल्याने वेतागलेली ती मूर्तिमंत करवादिनी बनली. रमणलालही वैतागला. "बाबा, फोडतो हे मडके आम्ही!" म्हणत पोराने मडके आपटले खाली. पण मडक्याला काहीच न झालेले पाहून रमणलालला आठवले, हे मडके अभंग आहे आणि शिवजींनी देताना तसे सांगितलेच होते! कुठून हे अमर आणि अभंग मडके आणले असे होऊन गेले रमणलालला.

काही महिने असेच गेले मध्ये.

आपल्या मडक्याने काय झाले असेल अशी पार्वतीला उत्सुकता वाटत होती.

ती म्हणाली, "भगवनऽ, रमणलाल आता चांगलाच सुधारला असेल नाही?"
शंकर भगवान हसत म्हणाले, "पाहायचेय  तुला उमे? चल दाखवतो. "

असे म्हणून दोघे अदृश्य रूपात पृथ्वीतलावर आले.
रमणलालच्या बंगल्यावर 'स्वामी रमणानंद महाराज आश्रम' अशी मोठी पाटी होती. बाहेर भक्तांची भली मोठी रांग. गर्दीच गर्दी. रमणलाल एका सिंहासनावर बसलेला. बाजूला ते मडके सजवून ठेवलेले. त्याच्या बाजूला एका सीडी प्लेयर वर सतत 'शिव शिव' जपाची रेकॉर्ड लावलेली. रमणानंद स्वामी आशीर्वादासाठी फक्त हात दाखवत गप्प बसलेले. मडक्यातून राक्षस बाहेर येतोय आणि शिव नामाच्या जपाबरोबर आत जातोय. भक्तगण तल्लीन होऊन बघत आहेत. रमणलालची मुले गर्दीला आवर घालत आहेत. जाता जाता भक्तगण दक्षिणा टाकत आहेत. बाहेर शिवलिंगाची जोरदार विक्री होतेय आणि ‘शिव शिव’ जपाच्या रेकॉर्डस खपताहेत!
शंकर भगवान हसले आणि पार्वतीला म्हणाले, "चल उमे परत जाऊ. "

ते निघून गेले आणि रमणलालचा त्या अभंग मडक्यातून होणारा उत्कर्षही  अभंगच राहिला. आजही भरतपुरात गेलात तर 'शिव शिव' मंत्र म्हणत लोक चालताना दिसतात. रमणानंद स्वामींनी देह ठेवला, त्यानंतर त्यांच्या मुलांनी हे भक्तिकार्य सुरू ठेवले. आज त्यांची तिसरी पिढी या देवकार्यात आहे.
आणि ते अभंग मडके? ते ही अजून तिथेच आहे त्या रमणानंद आश्रमाच्या विस्तीर्ण आणि पवित्र वास्तूत! ना ते राक्षस बदलले ना रमणानंदांच्या पुढच्या पिढ्या!

# १० खड्डेपुराण

काही गोष्टी उगीच बदनाम होत असतात. रस्त्यावरील खड्डे हे त्यातील एक! खरे तर खड्डे आणि खाचखळगे हे भारतीय तत्वज्ञानातील जीवन जगताना येणाऱ्या अडथळयांचे प्रतीक आहे. असे असताना ते नाहक बदनाम व्हावेत ना!
अर्थात हे म्हणणे आमचे आहे. आमचे आमच्या घरी सुद्धा कोणी ऐकत नाही. तेव्हा खड्ड्यांवरील आमचे मुलभूत आणि मुलगामी वगैरे चिंतन कोण ऐकणार? म्हणजे कोणीच नाही ऐकणार याबद्दल आम्हास तीळमात्रही शंका नाही! तरीदेखील हे आम्ही आमच्या वाचकांसमोर हे मांडत आहोत. खड्ड्यांना नाहक बदनामीस सामोरे जावे लागत आहे.. आपल्या संस्कृतीतील दुस्तर भवसागराचे प्रतीक असे हे खड्डे भ्रष्टाचाराचे प्रतीक बनून राहावेत ना! या सारखा दैवदुर्विलास नसेल.
पण 'जिसका कोई नही उसका तो खुदा है यारो' म्हणतात तसा या खड्ड्यांना 'खड्ड्यात जा' न म्हणता आम्ही मदतीस धावून आलो. आम्ही कोण? बाणेदारपणे आम्हीही विचारू शकतो.. म्हणूनि काय पुसशी.. पण नाही! दाताड वेंगाडुनि आम्ही कोण हे सांगणारच! कारण आम्ही मराठी भाषेचे सुपुत्र आहोत आणि तिचे 'पांग फेडून तिला वैभवाच्या शिरी बसविणें'साठी 'साप्ताहिक अणकुचीदार' चालवतो. खड्डे आणि खळगे हे सदर आम्ही नियमित चालवत असतो. हे आमचे साप्ताहिक लोकप्रिय असले तरी ते मिळणे दुर्मीळ आहे. त्यामुळे कित्येकांनी त्याचे नाव ऐकले नसेल. तर या खड्ड्याधारित लघु लघु लेख किंवा कथा आम्ही मागवल्या. बक्षिसे लावून! पहिले बक्षीस चक्क एक टायर स्कूटरसाठी! दुसरे बक्षीस एक टायर ट्यूब, तिसरे बक्षीस दोन महिने लल्लन आणि लल्लन टायरवाल्याकडे मोफत हवा आणि उत्तेजनार्थ म्हणून त्याच्याकडेच एकदा फुकटात पंक्चर रिपेर! असली बक्षिसे लावली की प्रवेशिकांचा ओघ लागला नुसता! कुठल्याही रस्त्यावर जसे खड्डे असावेत तसा उदंड प्रतिसाद

मिळाला. त्यातील प्रथम तीन आणि उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त एक असे चार लेख येथे प्रसिद्ध करीत आहोत.

१.
जीवन एक खड्डा!

पथिक: मुनिवर हा रस्ता सफलतेकडे जाईल का?

मुनिवर: अवश्य जाईल वत्सा! सफलतेकडे जाणारा रस्ता खाच खळग्यातून जातो आणि पालिकेच्या कृपेने या रस्त्यात खूप सारे खड्डे आहेत.

पथिक: आपला आशिर्वाद असावा मुनिवर. पण महाराज, सफलता म्हणजे काय हे मला सांगाल काय?

मुनिवर: वत्सा तू अजून लहान आहेस, नादान आहेस. तूर्तास एवढेच समज की सफलता म्हणजे या रस्त्यावरून दुसऱ्या टोकावर एकही हाड न तोडता किंवा एकही सांधा खिळखिळा न होता पोहोचणे

( जीवन जलाराम जावळे, डुबकेवाडी )

२.
खड्डा : एक वृत्तांत!

मध्यंतरी मुंबईत २५६ खड्डे असल्याचे पालिकेने जाहीर केले आणि एकच खळबळ माजली. एकतर खड्डे मोजणी करणे कर्मकठीण. त्यात एकच खड्डा पुन्हा पुन्हा मोजला गेला तर मुश्कील. मला तर वाटते पालिकेने खड्ड्यांना पण नावे द्यावीत. म्हणजे महात्मा गांधी खड्डा, नेहरू खड्डा, इंदिरा खड्डा, राजीव खड्डा आणि नंतर सोनिया, राहूल, प्रियांका इ. अशा खड्ड्यांची लाईन लागेल. यात कदाचित परप्रांतियांची नावे दिली जाण्याचा धोका आहे पण एकच खड्डा परत परत तरी मोजला जाणार नाही. ह्या २५६ आकड्यामुळे पालिकेला इमरजन्सी मिटिंग बोलवावी लागली. आयुक्तांनी सर्वप्रथम खड्ड्यांच्या समस्येबद्दल निवेदन केले. त्यात त्रिसदस्यीय समितीने संपूर्ण अभ्यास केल्यावर काढलेला निष्कर्ष सादर केला. ह्या अभ्यासानुसार हे खड्डे पावसाच्या पाण्यामुळे पडले आहेत असे सिद्ध केले गेले आहे. यावर विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की काही रस्तांवर खड्डे पडले आहेत याची चौकशी होण्यापेक्षा काही रस्त्यांवर ते का

पडले नाहीत याची सखोल चौकशी व्हावी. एका सदस्याने ठेकेदाराला कितीही दंड झाला तरीही त्याने material मध्ये एवढी बचत केली आहे की दंड भरून ही तो फायद्यातच असेल अशी आकडेवारी सादर केली. सभागृह नेत्यांनी त्यावर वेगळाच मुद्दा मांडला. त्यांच्या म्हणण्यानुसार काही गावांत ही खड्ड्यांची समस्याच नाही कारण तिथे रस्तेच नाहीत. तेव्हा खड्डे असणे हे प्रगतीचे लक्षण आहे असे ते म्हणाले. त्यानंतर विरोधी पक्षनेत्यांनी अधिकच मुलभूत मुद्दा उपस्थित केला. त्यांनी खड्डा या शब्दाची कायदेशीर व्याख्या काय आहे याची पृच्छा केली. पाच इंच खोल असलेल्याला खड्डा म्हणावे की अर्धा फूट खोल असेल त्याला म्हणावे यावर वाद झाला. काही शिक्षित सदस्यांनी खड्ड्यांची लांबी, रूंदी आणि खोली यावरून त्याचे आकारमान गणिती पद्धतीने काढण्याची सूचना केली. परंतु खड्ड्याची कायदेशीर व्याख्या कोणीच सांगू न शकल्याने मुळात खड्डेच बेकायदेशीर असून त्यांची मोजणी देखील बेकायदेशीर असल्याचा ठराव झाला. आयुक्तांनी शेवटी यासाठी एक समिती नेमण्याची घोषणा केली. त्यातच आयुक्तांचे पी. ए. घाईघाईत सभागृहात आले आणि त्यांनी हा संदेश आयुक्तांना दिला की मुंबईत कित्येक ठिकाणी दोन  खड्ड्यांची युती होऊन एक आणि काही ठिकाणी तीन-चार खड्ड्यांची महाआघाडी हॊऊन महाखड्डे तयार खाले आहेत त्यामुळे खड्ड्यांची एकूण संख्या खूपच कमी व्हायला मदत झाली आहे.
( गोविंद गणाजी गायदुधे, गायवाडी )

३.
नेमेचि येतो..

नेमेचि येणाऱ्या पावसाळ्याचे कौतुक कोणी बाळ करीत असतानाच रस्ते खड्ड्यांनी आक्रमिले जातात. मग वाचकांच्या पत्रांचा पाऊस पडायला लागतो. पेपरात रकाने भरभरून बातम्या आणि अग्रलेख यायला लागतात. टीव्ही वाले पण टीआरपी नुसार खड्ड्य़ांचे closeups दाखवायला लागतात. काही चॅनल्स वर हे खड्डे आणि चंद्रावरील खड्डे यावर तुलनात्मक कार्यक्रम होऊ लागतात. एका चॅनेलनी तर मॅरेथॉनच्या धर्तीवर खड्डाथॉनची घोषणा केली. यात स्पर्धकांना दोन किमी खड्ड्याखुड्ड्यातून धावावे लागणार होते.
या सर्वात गलबल्यात रस्ता आणि खड्डे यांची प्रतीकात्मताच हरवत चालली आहे असे वाटते. भारतीय संस्कृतीत प्रतीकांचे महत्त्व फार. कित्येकदा तर संस्कृतीपेक्षाही प्रतीके

जास्त महत्त्वाची. आता कावळा फांदीवर बसला हे साधे वाक्य घ्या. या वाक्याचे आपापल्या वकूबानुसार वेगवेगळे अर्थ काढता येतील.
मोठा वकूब : झाड हे अखिल विश्वाचे प्रतीक आहे. त्यावर चा कावळा म्हणजे तुम्ही आम्ही. कावळा उडाला तर झाडाचे काहीच बिघडत नाही, तद्वत एका माणसाच्या असण्या नसण्याने जग काही बंद पडत नाही.
मध्यम वकूब : झाड म्हणजे आत्मा आणि कावळा म्हणजे प्राण. कावळा उडाला तरी झाड तिथेच राहते म्हणजे आत्मा अमर राहतो.
शून्य वकूब : कावळा नावाचा एक पक्षी एका झाडाच्या फांदीवर बसला आहे.
आपल्याला हवा तसा अर्थ आपण काढू शकतो. सुप्रसिद्ध डॉ. गजेन्द्र कर्वे यांना तर ड्रायव्हिंग लायसन्स मध्ये कृष्णाच्या वासलेल्या 'आ' मध्ये ब्रह्मांड दिसावे तसे आयुष्याचे सार दडलेले दिसते. लायसन्स  म्हणजे आपला जन्म. आता जीवन रूपी रस्त्यावर नीट गाडी हाका नाहीतर अपघात ठरलेला वगैरे वगैरे. तर मुद्दा हा की रस्ता आणि खड्ड्यांचे पण तसेच आहे. जीवनरूपी रस्त्यावर अडचणीचे खाच खळगे असायचेच. त्यात आपल्याला सांभाळून चालावे लागेल असा संदेश हे खड्डे देत असतात. कुठेतरी खड्डेविरहित रस्ते बनवून आपण आपला हा सांस्कृतिक वारसा गमावणार आहोत काय हा खरा प्रश्न आहे.
( गोळाराम तोळाराम तुळपुळे,  कुरकेवाडी बुद्रूक )

४.
विधीमंडळातून..

खड्ड्यांच्या मुद्यावर विचारविनिमय करण्यासाठी विधीमंडळाची खास बैठक आज बोलावण्यात आली. खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग कमी झाल्याने अपघातांची संख्या कमी झाल्याची आकडेवारी परिवहन मंत्र्यांनी सादर केली. कित्येक वाहन चालक वाहने बाहेर काढायचे टाळत असल्याने प्रदूषणात घट झाल्याचे पर्यावरण मंत्र्यांनी सांगितले. चर्चेला उत्तर देताना गृहमंत्री म्हणाले की 'खड्ड्यात जा' सारखा बाणेदार वाक्प्रचार देणाऱ्या  खड्ड्यांची नाहक बदनामी होत असून मराठी भाषेची ही गळचेपी सहन केली जाणार नाही. 'गाव तिथे रस्ता आणि रस्ता तिथे खड्डा' ही योजना पूर्ण महाराष्ट्रात अंमलात आणण्याची घोषणा त्यांनी केली.
( चुं. रा. चामखीळवार, नागपूर )

(विजेत्यांनी आपली बक्षिसे कार्यालयातून शुक्रवारी दुपारी २. २२ ते २. ३२ या वेळात घेऊन जावीत. येताना आपले आधार कार्ड आणणे आवश्यक)

*****

साप्ताहिक अणकुचीदारची
सडेतोड आणि टोकदार भूमिका

खड्डे पुराणातील ह्या उद्बोधक गोष्टी. ज्या गावात रस्तेच नाहीत त्यांच्या जखमांवर पेपरातील पानभर खड्ड्यांच्या फोटोंतून मीठ चोळून खिजवणे कुठल्या संस्कृतीत बसते ते वाचकांनीच ठरवावे!

संपादक

*उपसंहार..*

## *११ तळे राखी तो पाणी (फक्त) चाखी?*

कुंपण शेत खाते म्हणणाऱ्यांची मला कीव येते.
तळे राखणारा पाणी चाखू शकतो तर कुंपणाने काय घोडे मारलेय? तळे राखणारा अख्खे तळे पित नाही कारण त्याची तेव्हढी क्षमता नसते म्हणून? त्याने आपली ती क्षमता न वाढवता नुसत्या पाणी चाखण्यावर समाधान मानावे याहून दुसरा दैवदुर्विलास कोणता? समोर गोडे पाणी असताना ढीगभर... थेंबही नाही म्हणावे अशीही स्थिती नाही. तरी त्यांचा हा कर्मदरिद्रीपणा? शेत खाणाऱ्या कुंपणाने तेवढी आपली क्षमता वाढवण्यासाठी मेहनत घेतली असते. श्रम करून आपल्या आवाक्यात वाढ करून घेणे यासाठी तळे राखणाऱ्यास कोणी अडवून ठेवलेय काय? थोडक्यात चूक कुंपणाची नाही. तळे राखणाऱ्याच्या कर्मदरिद्रीपणाची आहे. यावरच हे संपत नाही. या पुढे जाऊन ते कल्पनादारिद्री पण असतात. सरकारी खात्यात कसे सगळे वेगवेगळ्या मार्गांनी खात असतात. नुसतेच ताटली घेऊन वाढा जेवण असे नाही म्हणत. आपल्याला मिळणाऱ्या पगारास जागून खाण्यासाठी नवनवीन मार्गांच्या कल्पना ते लढवतात. यातील काहीच तळे राखणाऱ्यांस जमू नये? नुसतेच चाखत माखत तळे उष्टावणारे हे राखणदार या उज्ज्वल परंपरेस एक कलंक आहेत.
अर्थात हे थोडे जास्तच कठोर होतेय. म्हणजे बिचारे तसे चाखत माखत का होईना पाणी चाखतात. आपले ब्रीद नि घेतलेला वसा नाही टाकत. उतत नाहीत, मातत नाहीत. कुंपण एका दमात सशासारखी ताकद दाखवत असेल पण तळे राखणारा आपली ताकद हळू हळू का होईना कासवासारखी दाखवतोच. सैनिकांच्या पायाच्या

बोटाच्या हाडांना एक ‘मार्च’ फ्रॅक्चर होते म्हणे. म्हणजे प्रत्यक्ष एकच घाव न बसता थोड्या थोड्या घावांनी पायाचे हाड दुभंगते. आपले तळे राखी या वर्गातले. कुंपणवाले एक घाव दोन तुकडे वर्गातले. एकूण दोघांचे मार्ग भिन्न असतील पण ध्येय एकच. आणि ते गाठल्यावाचून या ध्येयनिष्ठांना चैन नाही.

या सर्वात सगळयात मागास किंवा काळीमा फासणारे ते स्वयंघोषित प्रामाणिक! हे काहीच खात नाहीत. काही तर खाऊ देणार नाहीत अशा गमजाही मारतात. आपल्या संस्कृतीचा हा विशेष. सोडणे, त्याग, न करणे यास प्रतिष्ठा अधिक ! जसे खाणाऱ्यांत शाकाहारी श्रेष्ठ कारण ते मांसाहार नाही करत तसे या प्रामाणिकांचे झालेय. एक तर यांची संख्या काय? अल्पसंख्यांकांची ही मिजास? कोणी म्हणेल तुझा पगार किती.. बोलतो किती ! तर या प्रामाणिकांमुळे खरे तर ती वेगवेगळी ऍंटी करप्शन खाती उघडावी लागलीत. विचार करून सांगा या दहा टक्के अल्पसंख्यांकाना शोधून काढण्यासाठी असा काही ब्युरो काढला तर किती सरकारी खर्च वाचेल? ऍंटी करप्शन वर खर्च किती? त्याचा गवगवा किती? खाणारे किती? पकडले जातात त्यातले दहा टक्के. त्यातील दहा टक्क्यांना काही शिक्षा होते. त्यासाठी त्या खात्यावर खर्च किती? याहून सोपे म्हणजे आडमार्गास राजमार्ग का म्हणू नये? असतील काही प्रामाणिक अल्पसंख्यांक, त्यांचा भार इतरांनी का सोसावा? थोडक्यात काय तर सगळयांना ही कुंपण द्वेषाची कावीळ झाली आहे. उगाच त्यांच्या नावे शंख करकरून कानठळया बसवणे हाच जणू एक छंद! त्यात उगाच त्या दहा टक्के सुक्यांबरोबर नव्वद टक्के ओले भरडले जातात.. याचे कोणी ठेवणार का भान?

या पुढे करप्शन ब्युरो स्थापन करा. कोणी खात नाही म्हटल्यावर त्याची करा चौकशी. मग बघा कशी धाड धाड कामे होतात. मागे एका द्रष्ट्याने ( अति विनयामुळे हे आम्ही सांगू इच्छित नाही की तो द्रष्टा म्हणजे आम्हीच ) म्हटलेय की भ्रष्टाचारास भ्रष्टाचार न म्हणणे हा तो संपवायचा रामबाण इलाज आहे. असे असताना यावर मायबाप सरकार विचार करील काय?

असो. आम्ही आमचे कर्तव्य पार पाडले. प्रामाणिकपणे !

आता चेंडू.. सरकारच्या कोर्टात ! तोवर तळे राखणारे हा किल्ला ही लढवतीलच !